# महाराष्ट्र जिल्हा नियोजन समिती (निवडणूक)
# नियम,१९९९

# महाराष्ट्र जिल्हा नियोजन समिती (निवडणूक) नियम १९९९,

(सदरचे नियम प्रथम महाराष्ट्र शासन राजपत्र असरधारण भाग चार-ब मध्ये **दिनांक २२ जुलै, १९९९** रोजी प्रसिद्ध करण्यात आले)

१. **संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ :-** (१) महाराष्ट्र जिल्हा नियोजन समिती (निवडणूक) नियम, १९९९ असे म्हणावे.

(२) ते भारताच्या संविधानाच्या पाचव्या अनुसूचीच्या परिच्छेद ६ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन भारताचे राष्ट्रपती यांनी वेळावेळी घोषित केलेले अनुसूचित क्षेत्र वगळून, संपूर्ण महाराष्ट्र राज्यात लागू होतील.

(३) हे नियम महाराष्ट्र शासन शासकीय राजपत्रात अधिसुचनेव्दारे नियत करील त्या दिवसापासून अंमलात येतील.

२. **व्याख्या :-** (१) संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, या नियमामध्ये:-

(अ) "**अधिनियम**" म्हणजे महाराष्ट्र जिल्हा नियोजन समिती (रचना व कामे) अधिनियम, १९९८ **हा होय.**

१***

(क) "**निवडणूक**" म्हणजे जिल्हा नियोजन समितीची निवडणूक आणि यामध्ये कोणत्या निवडणूकीचा समावेश होतो.

(ड) "**नमुना**" या नियमांना जोडलेला नमुना

(इ) "**मतदारांची यादी**" म्हणजे खालील निर्वाचित २**** सदस्यांची यादी:-

(एक) ग्रामीण निर्वाचन क्षेत्रासाठी जिल्हा परिषद

(दोन) संक्रमणकालीन निर्वाचन क्षेत्रासाठी जिल्हा परिषद

(तीन) लहान नागरी क्षेत्र असलेल्या निर्वाचन क्षेत्रासाठी नगर परिषदा

(चार) मोठे नागरी क्षेत्र असलेल्या निर्वाचन क्षेत्रासाठी महानगरपालिका.

(फ) "**सार्वजनिक सुटी**" म्हणजे जो कोणताही दिवस पराक्रम्य अभिलेख **अधिनियम** (निगोशिएबल इन्स्ट्रूमेंट ॲक्ट) १८८१ (१८८१ चा २६) याच्या कलम २५ च्या प्रयोजनासाठी सार्वजनिक सुटीचा असेल किंवा राज्य शासनाने राज्यातील किंवा त्यांच्या कोणत्याही भागातील कार्यालयांसाठी सुटीचा दिवस म्हणून जाहीर केलेला कोणताही दिवस.

(ग) "**आरक्षित जागा**" म्हणजे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग आणि स्त्रिया यांच्यासाठी राखून ठेवण्यात आलेली जागा.

(ह) "**निर्वाचन अधिकारी**" म्हणजे नियम ७ अन्वये नियुक्त केलेला निर्वाचन अधिकारी आणि त्यामध्ये नियम ८ अन्वये नियुक्त केलेला सहायक निर्वाचन अधिकारी याचा समावेश होतो.

(आय) "**कलम**" म्हणजे अधिनियमाचे कलम.

---

१.अधिसूचना क्र.जिनीस १०९९/प्रक्र७२/१४४४ दिनांक ५ मे २००० अन्वये वगळण्यात आले.

२.अधिसूचना क्र.जिनीस२०००/प्रक्र ७२/१४४४ दिनांक ९ एप्रिल २००७ अन्वये "परिषद" हा

(२) या नियमामध्ये वापरण्यात आलेले परंतु व्याख्या न करण्यात आलेले शब्द व शब्दप्रयोग यांना भारताच्या संविधानाचा भाग नऊ व नऊ (अ) अन्वये किंवा या अधिनियमान्वये त्यांना जे अर्थ नेमून देण्यात आलेले असतील तेच अर्थ असतील.

**३. जिल्हा नियोजन समितीची निर्वाचन क्षेत्रे:-(१)** जिल्हा नियोजन समितीचे सदस्य निवडण्याच्या प्रयोजनार्थ जिल्हयाचे क्षेत्र खालील निर्वाचित क्षेत्रामध्ये विभागण्यात येईल.

(अ) ग्रामीण निर्वाचन क्षेत्र,

(ब) संक्रमणकालीन निर्वाचन क्षेत्र,

(क) लहान नागरी निर्वाचन क्षेत्र,

(ड) मोठे नागरी निर्वाचन क्षेत्र,

(२) प्रत्येक निर्वाचन क्षेत्रामधून निवडावयाच्या एकूण सदस्यांची संख्या, जिल्हाधिकारी संपूर्ण जिल्हयातील व प्रत्येक निर्वाचन क्षेत्रातील ग्रामीण तसेच नागरी लोकसंख्येच्या प्रमाणात ठरवितील.

(३) जिल्हाधिकारी, राज्य शासनाशी विचारविनिमय करुन अधिनियमाच्या कलम ४ मध्ये तरतूद केलेल्या पध्दतीनुसार प्रत्येक निर्वाचन क्षेत्रात आरक्षित करावयाच्या जागांचे वाटप करतील.

**स्पष्टीकरण** :- या नियमाच्या प्रयोजनार्थ जागेचा अर्धा किंवा त्यापेक्षा अधिक अपूर्णांक एक म्हणून गणण्यात येईल आणि अर्ध्यापेक्षा कमी असणारा अपूर्णांक हिशोबात घेतला जाणार नाही.

**४. जिल्हाधिका-याच्या देखरेखीखाली या नियंत्रणाखाली घ्यावयाची निवडणूक:-** जिल्हा नियोजन समितीच्या निवडणुका जिल्हाधिका-यांच्या निदेशनाखाली, अधीक्षणाखाली व नियंत्रणाखाली घेतल्या जातील.

**५. मतदारांच्या याद्या तयार करणे :- (१)** अधिनियमाच्या कलम ३ च्या पोट कलम (३) च्या परिच्छेद (तीन) मधील खंड (अ) अन्वये जिल्हा नियोजन समितीचे सदस्य निवडण्याच्या प्रयोजनार्थ जिल्हाधिकारी, जिल्हयातील जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, कोणतेही असल्यास नगर परिषदांचे आणि नगर पंचायतीचे मुख्य अधिकारी आणि महानगरपालिकांचे आयुक्त यांना त्यांच्या स्थानिक प्राधिका-यांच्या क्षेत्रातंर्गत निवडून आलेल्या [१]***-सदस्यांची यादी जिल्हाधिकारी त्या संदर्भात विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकापूर्वी [२]नमुना-एक मध्ये] सादर करण्यासाठी विनंती करतील.

(२) अशी यादी प्राप्त झाल्यानंतर जिल्हाधिकारी प्रत्येक निर्वाचन क्षेत्रासाठी मतदारांची स्वतंत्र यादी मराठीमध्ये तयार करतील व अशी यादी जिल्हयातील जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हापरिषदेचे संबंधित कार्यालय, नगर परिषदा, नगर पंचायती व महानगरपालिका यांच्या कार्यालयातील सूचनाफलकावर प्रकाशित केली जाईल. ३[मतदारांची यादी प्रसिद्ध झाल्यापासून तीन दिवसाच्या आत]कोणतीही हरकत किंवा भूल किंवा चूक जिल्हाधिका-यांच्या निदर्शनास आणावी आणि अशी चूकभूल अभिलेख तपासून जिल्हाधिका-यांकडून वेळीच दुरुस्त केली जाईल. जिल्हाधिका-यांचा निर्णय अंतिम राहील.

(३) पोटनियम (२) अन्वये तयार केलेली अंतिम यादी, त्याच पध्दतीने पुन्हा प्रसिध्द करण्यात येईल आणि जिल्हाधिका-यांकडून त्यात सुधारणा करण्यात येईपर्यंत कोणत्याही पोटनिवडणुकीच्या प्रयोजनासाठी मतदारांची यादी म्हणून ती अंमलात राहील.

---

१. अधिसूचना क्र.जिनीस२०००/प्रक्र ७२/१४४४ दिनांक ९ एप्रिल २००७ अन्वये "परिषद" हा शब्द वगळण्यात आला.

२. अधिसूचना क्र.जिनीस१०९९/प्रक्र ७२/१४४४ दिनांक ५ मे २००० अन्वये हा मजकुर अंतर्भूत करण्यात आला.

[1][परंतु, कोणत्याही मतदारसंघात, सार्वत्रिक निवडणुकीद्वारे, किंवा पोट-निवडणुकीद्वारे, एखादे पद भरण्यात आले असेल तर, अशा निवडून आलेल्या सदस्याचे नाव, नामनिर्देशन पत्रे सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी मतदारांच्या यादीत नोंदण्यात येईल.]

[2][(४) या नियमात काहीही अंतर्भूत असले तरी जिल्हाधिका-यास सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे त्या विहित केलेल्या सर्व किंवा कोणत्याही तारखांमध्ये फेरफार करुन सुधारित तारखा नियत करता येतील.]

६. **मतदारांची यादी निर्णायक असणे:-** एखाद्या व्यक्तीने अनर्हता ओढवून घेतल्याच्या अधीन राहून नियम ५ चा पोट-नियम (३) खाली अंतिमत: प्रकाशित केलेली मतदारांची यादी मतदारांस मत देण्याचा हक्क किंवा कोणत्याही निवडणूकीस निवडून येण्यासाठीचा त्यांचा हक्काचा निर्णायक पुरावा असेल.

७. **निर्वाचन अधिका-याची नियुक्ती:-**जिल्हाधिकारी, अतिरिक्त जिल्हाधिका-यापेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा अधिका-याची, जिल्हा नियोजन समितीच्या निवडणूकीच्या प्रयोजनार्थ, निर्वाचन अधिकारी म्हणून नियुक्ती करील.

८. **सहायक निर्वाचन अधिका-याची नियुक्ती:-** (१) जिल्हाधिकारी प्रत्येक निर्वाचन क्षेत्रासाठी सहाय्यक जिल्हाधिक-याच्या [२][किंवा उपजिल्हाधिका-याच्या] दर्जापेक्षा कमी नसेल अशा अधिका-याची, सहायक निर्वाचन अधिकारी म्हणून नियुक्ती करील.

(२) प्रत्येक सहायक निर्वाचन अधिकारी, निर्वाचन अधिका-याच्या नियंत्रणाच्या अधीन राहून, निर्वाचन अधिका-याची सर्व किंवा कोणतेही कर्तव्ये पार पाडण्यास सक्षम असेल

परंतु, नामनिर्देशन पत्राची छाननी करण्यासंबंधातील निर्वाचन अधिका-यास त्यांचे कर्तव्य पार पाडण्यास अपरिहार्य कारणास्तव प्रतिबंध केला असल्या खेरीज सहायक निर्वाचन अधिका-यास त्यापैकी कोणतेही कर्तव्य पार पाडता येणार नाही.

(३) पोट-नियम (२) च्या तरतूदीच्या अधीन राहून या नियमातील,निर्वाचन अधिका-याच्या निर्देशामध्ये संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,सहायक निर्वाचन अधिका-याचा अंतर्भाव असल्याचे समजण्यात येईल.

९. **निर्वाचन अधिका-याची सर्वसाधारण कर्तव्ये:-** या नियमानुसार तरतूद केलेल्या पध्दतीने निवडणूक प्रभावीपणे पार पाडण्यासाठी आवश्यक असतील अशा सर्व कृती आणि बाबी कोणत्याही निवडणुकीच्या वेळी करणे हे निर्वाचन अधिका-याचे सर्वसाधारण कर्तव्य असेल.

[३][**१०. मतदान केंद्रे** - निर्वाचन अधिकारी, नि:पक्ष निवडणूक घेण्यासाठी सोयीस्कर असेल अशा ठिकाणी प्रत्येक मतदार संघाकरिता पुरेशा मतदान केंद्रांची तजवीज करील. निर्वाचन अधिकारी प्रत्येक मतदान केंद्राला नेमून द्यावयाच्या मतदारांची संख्या ठरवील. मतदान केंद्रांची यादी, मतदानाच्या तारखेच्या किमान सात दिवस आधी संबंधित मतदान केंद्राच्या सूचना फलकावर मतदारांची यादी आणि त्यांची कार्यालये कोठे आहेत याबाबतची माहिती लावील.

परंतु, जिल्हाधिकाऱ्यास, आपल्या स्वेच्छा निर्णयाने मतदान केंद्रांची संख्या विनिर्दिष्ट करता येईल.]

११. **मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी यांची नियुक्ती:-** (१) निर्वाचन अधिकारी प्रत्येक मतदान केंद्रासाठी एका शासकीय कर्मचा-याची नियुक्ती मतदान केंद्र अध्यक्ष म्हणुन आणि मतदान केंद्राध्यक्षास सहकार्य करण्यासाठी जितक्या मतदान अधिका-यांची आवश्यकता आहे तितके अधिकारी नियुक्तकरील.

---

१. अधिसूचना क्र.जिनीस१०९९/प्रक्र ७२/१४४४ दिनांक ५ मे २००० अन्वये अंतर्भूत करण्यात आले.

२.अधिसूचना क्र.जिनीस२०००/प्रक्र ७२/१४४४ दिनांक ९ एप्रिल २००७ अन्वये अंतर्भूत करण्यात आले.

परंतु, जर एखादा मतदान अधिकारी मतदान केंद्रावर अनुपस्थितीत राहीला तर मतदान केंद्राध्यक्षास दुस-या एखाद्या व्यक्तीची मतदान अधिकारी म्हणुन नियुक्ती करता येईल.

(२) मतदान केंद्राध्यक्षाने तसे निदेश दिल्यास मतदान अधिकारी या नियमाखालील तरतूदीनुसार मतदान केंद्राध्यक्षाची सर्व कर्तव्ये किंवा कोणतेही कर्तव्ये पार पाडु शकेल.

(३) जर मतदान केंद्राध्यक्ष, आजारपणामुळे अथवा टाळता न येणा-या कारणामुळे गैरहजर असेल तर मतदान केंद्रावरील त्याची सर्व कर्तव्ये निर्वाचन अधिका-याने प्राधिकृत केलेला अधिकारी पार पाडील.

**१२. मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिका-यांची सर्वसाधारण कर्तव्ये:-** (१) प्रत्येक मतदान केंद्राच्या ठिकाणी सुव्यवस्था ठेवणे व मतदान नि:पक्षपातीपणे होत असल्याचे पाहणे हे मतदान केंद्राध्यक्षाचे सर्वसाधारण कर्तव्य असेल.

(२) प्रत्येक मतदान केंद्राच्या ठिकाणी मतदान केंद्राध्यक्षास त्याची कर्तव्ये पार पाडण्यास सहाय्य करणे हे प्रत्येक मतदान अधिका-याचे कर्तव्य असेल.

**१३. निवडणुकीच्या विविध टप्प्यांसाठी दिनांक वगैरे निश्चित करणे:-** (१) जिल्हाधिकारी, जिल्हा नियोजन समितीच्या निवडणुकीचा दिनांक, राज्य शासनाशी विचारविनिमय करुन नमुना एक-अ मध्ये अधिसूचित करील.

१[“(२) जिल्हाधिकारी, राज्य शासनाशी विचार विनिमय करुन, मतदारांची अंतिम यादी प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ७ दिवसांच्या आंतर असेल अशा रीतीने निवडणुकीच्या कार्यक्रमास पुढीलप्रमाणे अंतिम रुप देईल:-

| | |
|---|---|
| (एक) नामनिर्देशन पत्रे दाखल करण्याचा अंतिम दिनांक | निर्वाचन अधिकाऱ्याच्या आदेशाच्या तारखेपासून ४ दिवसांच्या आत. |
| (दोन) नामनिर्देशन पत्रे प्रसिध्द करावयाचा दिनांक | नामनिर्देशन पत्रे दाखल करण्यासाठी निश्चित केलेल्या शेवटच्या तारखे पर्यंत जसजशी प्राप्त होतील त्याप्रमाणे. |
| (तीन) नामनिर्देशन पत्रांची छाननी करावयाचा दिनांक | नामनिर्देशन पत्रे दाखल करण्याच्या शेवटच्या तारखेनंतर २ दिवसांच्या आत. |
| (चार) वैध नामनिर्देशन पत्रांची यादी प्रसिध्द करावयाचा दिनांक | नामनिर्देशन पत्रांची छाननी झाल्यानंतरचा पुढील दिवस |
| (पाच) नामनिर्देशन पत्र फेटाळले गेल्यास, जिल्हाधिका-याकडे अपील करण्याचा कालावधी | नामनिर्देशन पत्र फेटाळल्याच्या दिनांकापासून २ दिवसांच्या कालावधीच्या आत. |
| (सहा) जिल्हाधिकाऱ्याकडे केलेल्या अपिलावरील अंतिम निर्णयाचा कालावधी. | अपिल मिळाल्याच्या दिनांकापासून २ दिवसांच्या आत |

---

१. अधिसू. क्र.जिनीस२०१३/प्रक्र०३/१४८१ दि.५ जानेवारी, २०१३ अन्वये मुळ पोटनियमाऐवजी हा पोटनियम समाविष्ट करण्यात आला.

२. अधिसू. क्र.जिनीस२०००/प्रक्र ७२/१४४४ दिनांक ९ एप्रिल २००७ अन्वयेअंतर्भूत करण्यात

| | |
|---|---|
| (सात) अपिलानंतर, वैध नामनिर्देशन पत्रांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | अपिलावर निर्णय दिल्याच्या दिनांकापासून २ दिवसांच्या आत |
| (आठ) उमेदवारी मागे घेण्याची तारीख | अपिलावर निर्णय केल्यानंतर वैध नामनिर्देशन पत्रांची यादी प्रसिध्द करण्यासाठी निश्चित केलेल्या दिनांकानंतरचा पुढील दिनांक |
| (नऊ) निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची अंतिम यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | उमेदवारी मागे घेण्यासाठी निश्चित केलेल्या अंतिम दिनांकानंतरचा पुढील दिनांक |
| (दहा) आवश्यकता असल्यास ज्या दिवशी व ज्या वेळेत मतदान घेण्यात येईल तो दिनांक व ती वेळ | निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची अंतिम यादी प्रसिध्द झाल्याच्या दिनांका पासून सातवा दिवस व जिल्हाधिकारी यांच्या निर्णयानुसारची वेळ. |
| (अकरा) मतमोजणीचा दिनांक व वेळ आणि ठिकाण | मतदान घेतल्याच्या दिनांकापासून २ दिवसांच्या आत व जिल्हाधिकारी यांच्या निर्णयानुसारचे ठिकाण. |
| (बारा) मतदानाचा निकाल घोषित करण्याचा दिनांक. | मतमोजणी झाल्यानंतर लगेच. |

**स्पष्टीकरण :-** वरील प्रकरणात विनिर्दिष्ट केलेल्या बाबींमध्ये गणना करण्यांत आलेला दिनांक हा सरकारी सुटीचा दिवस असेल तर त्याच्या लगतनंतरचा कामकाजाचा दिवस संबंधित घटनांसाठी निश्चित करण्यात येईल.][1]

[2][(३) सार्वजनिक हितासाठी, निवडणूक कार्यक्रमात फेरबदल करणे आवश्यक आहे आणि त्याबाबत राज्य शासनाशी विचारविनिमय करण्यासाठी पुरेसा वेळ नाही, असे जिल्हाधिकाऱ्याचे मत झाले असेल तर, जिल्हाधिकाऱ्यास, त्याबद्दलची कारणे लेखी नोंदविल्या नंतर, त्या निवडणूक कार्यक्रमात फेरबदल करता येईल. अशा प्रत्येक प्रकरणी, जिल्हाधिकारी, अशा फेरबदल केलेल्या निवडणूक कार्यक्रमाची प्रत ताबडतोब राज्य शासनाकडे पाठवील.]

**१४. नियम क्र.१३ खालील [1] [निवडणूक कार्यक्रम] प्रसिध्द करण्याची रीत:-** [1] [निर्वाचन अधिकारी निवडणूकीचा कार्यक्रम प्रसिध्द करील त्याची एक प्रत] (अ) अनुक्रमे जिल्हाधिकारी, निर्वाचन अधिकारी, नगरपालिका आणि जिल्हा परिषद यांच्या कार्यालयाच्या सूचना फलकावर चिकटविण्यात येईल.

(ब) सदर आदेश जिल्हापरिषद व नगरपालिकांच्या कार्यक्षेत्रात मोठया प्रमाणात खप असलेल्या किमान दैनिक स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात येईल.

---

१. अधिसूचना क्र.जिनीस२०००/प्रक्र ७२/१४४४ दिनांक ९ एप्रिल २००७ अन्वये अंतर्भूत करण्यात आला.

२ अधिसूचना क्र.जिनीस२०००/प्रक्र ७२/१४४४ दिनांक ९ एप्रिल २००७ अन्वये हा बदल

**१५. उमेदवारांचे नामनिर्देशन:-** (१) एखादी व्यक्ती जर अधिनियमाच्या तरतूदीनुसार उमेदवार म्हणुन अर्हताप्राप्त असेल आणि त्याचे नांव मतदारांच्या अंतिम यादीत असेल तर, त्या व्यक्तीचे उमेदवार म्हणुन निवडणुकीसाठी नामनिर्देशन करता येईल.

(२) नियम १३ अन्वये सादर केलेले प्रत्येक नामनिर्देशन पत्र नमुना दोन मध्ये असेल.

[१] [परंतु, नामनिर्देशन पत्रातील प्रतिज्ञापन, पुर्ण करण्यास कसूर केल्यास किंवा पुर्ण करताना त्यात दोष राहिल्यास तो मोठया स्वरुपाचा दोष मानला जाईल.]

(३) निर्वाचन अधिकारी मागणी केल्यानंतर कोणत्याही मतदारास नामनिर्देशन पत्र पुरवील.

**१६. नामनिर्देशन पत्रे सादर करणे व विधीग्राहय नामनिर्देशनाकरिता आवश्यक बाबी :-** (१) नियम १३ च्या पोट-नियम (१) नुसार निश्चित केलेल्या दिनांकास किंवा त्यापूर्वी प्रत्येक उमेदवार स्वत: किंवा त्याच्या सूचकामार्फत उक्त नियमानुसार [१][निवडणूक कार्यक्रमात] उल्लेख केलेल्या वेळेत व ठिकाणी निर्वाचन अधिका-यास त्याचे नामनिर्देशन पत्र योग्य रीतीने भरुन व स्वत:ची आणि [२][**सूचकाची**] सही करुन पोहचते करील.

(२) अधिनियमानुसार किंवा या नियमानुसार कोणतीही व्यक्ती मतदार म्हणून अपात्र ठरविली नसेल आणि जिचे नाव ज्या निर्वाचन क्षेत्रामधून उमेदवार नामनिर्देशित करावयाचा आहे त्या मतदारांच्या यादीमध्ये असेल तर ती [१][एका पेक्षा अधिक उमेदवारांसाठी सूचक] म्हणुन राहू शकेल.

(३) राखीव जागेच्या बाबतीत अशा जागेची निवडणूक लढविण्यास पात्र असलेला उमेदवार तो राखीव जागेवर संबंधित प्राधिकरणावर निवडून आलेला आहे, अशा प्रकारचे संबंधित प्राधिका-याकडील प्रमाणपत्र सादर करील. (प्राधिकारी- जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा नगरपालिकेचे किंवा नगरपंचायतीचे मुख्य अधिकारी किंवा महानगरपालिकेचे आयुक्त)

[१][३ (अ) राखीव प्रवर्गातील एखादी व्यक्ती सर्वसाधारण प्रवर्गातून निवडणूक लढवीत असेल तर आणि जर अशा व्यक्तीने, नामनिर्देशन पत्र सादर करताना सक्षम प्राधिका-याकडून [२][सर्वसाधारण] प्रवर्गाचे प्रमाणपत्र सादर केले असेल तर, अशा व्यक्तीचे नामनिर्देशन पत्र त्या [२][सर्वसाधारण प्रवर्गासाठी] वैध असल्याचे समजण्यात येईल.]

(४) नामनिर्देशन पत्र सादर केल्यानंतर निर्वाचन अधिकारी, नामनिर्देशन पत्रामध्ये भरण्यात आलेली नावे, उमेदवाराची संख्या, त्याचे सूचक [४][व] त्याचे सूचक [५]**** नियम ५(३) मध्ये निर्दिष्ट केलेल्या मतदारांच्या यादीत नोंद केल्याप्रमाणेच आहेत याबाबत स्वत:ची खात्री करुन घेईल.

---

१. अधिसू. क्र.जिनीस२०००/प्रक्र ७२/१४४४ दि.९ एप्रिल, २००७ अन्वये असा बदल करण्यात आला

२. अधिसू. क्र.जिनीस१०९९/प्रक्र ७२/१४४४ दि.५ मे, २००० अन्वये हा बदल करण्यात आला.

३.अधिसू. क्र.जिनीस२०००/प्रक्र ७२/१४४४ दि.९ एप्रिल, २००७ अन्वये असा बदल करण्यात आला

४.अधिसू.क्र.जिनीस१०९९/प्रक्र ७२/१४४४ दि.५ मे, २००० अन्वये अंतर्भूत करण्यात आला

५. अधिसू.क्र.जिनीस१००७/प्रक्र २२/१४४४ दि.८ऑगस्ट, २००८ अन्वये "व" हा शब्द समाविष्ट करुन "व अनुमोदक" हे शब्द वगळण्यात आले.

(५) निर्वाचन अधिकारी, मतदारांच्या यादीतील नोंदीप्रमाणे, नामनिर्देशन पत्रातील उक्त नावे किंवा क्रमांकाना सारखेपणा आणण्याच्या दृष्टीने दुरुस्ती करण्यासाठी नामनिर्देशन पत्रातील हस्तदोष किंवा तांत्रिक चुका क्षमापित करतील. उक्त नोंदीतील एखादा लहान हस्तदोष किंवा छपाईचूक क्षमापित करण्यात यावी.

५ ***

**१८. नामनिर्देशनाच्या छाननीच्या दिनांकांची सूचना व तपासणीसाठी वेळ व ठिकाण :-** निर्वाचन अधिकारी, नियम १६ नुसार नमुना दोन मध्ये नामनिर्देशनपत्र मिळाल्यावर त्याची पोच नमुना २अ मध्ये देईल आणि ते पोहचविणारी/-या व्यक्तीस, दिवस, वेळ व नामनिर्देशन पत्राची छाननी करण्यासाठी निश्चित केलेले ठिकाण याची माहिती देईल आणि नामनिर्देशनपत्रामध्ये त्याचा अनुक्रमांक नोंदवील व नामनिर्देशनपत्र कोणत्या दिनांकाला कोणत्या वेळी त्यांना पोच करण्यात आले हे नमूद करुन त्यावर स्वाक्षरी करील आणि त्यानंतर शक्य तितक्या लवकर उमेदवार आणि सूचक अशा दोघांच्या नामनिर्देशन पत्रातील वर्णनाप्रमाणे वर्णन असलेले नामनिर्देशन पत्र त्याच्या कार्यालयात ठळक ठिकाणी लावण्याची व्यवस्था करील.[१][ निर्वाचन अधिकारी, जिल्हा नियोजन समितीच्या प्रत्येक मतदार संघाची निवडणूक लढविण्यासाठी ज्यांनी नामनिर्देशन पत्रे सादर केलेली आहेत अशा उमेदवारांची [३]{नियम ५५ मधील तरतुदीनुसार प्रवर्गनिहाय}नमुना दोन-अ (१) मधील एक यादी सुध्दा लावण्याची व्यवस्था करील.]

**१९. नामनिर्देशन पत्रांची छाननी:-** (१) नियम १३ नुसार नामनिर्देशन पत्राच्या छाननीकरिता निश्चित करण्यात आलेला दिनांक, उमेदवार, त्याचे निवडणूक प्रतिनिधी, प्रत्येक उमेदवाराचा एक सूचक आणि प्रत्येक उमेदवाराने प्राधिकृत केलेली दुसरी एक व्यक्ती याबाबत नियम १३ नुसार निश्चित केलेल्या वेळी व ठिकाणी उपस्थित राहू शकतील आणि निर्वाचन अधिकारी, नियम १६ नुसार अपेक्षित असल्याप्रमाणे सर्व उमेदवारांना पोच केलेली नामनिर्देशनपत्रे तपासण्याची वाजवी सुविधा देईल.

(२) निर्वाचन अधिकारी नंतर नामनिर्देशनपत्रांची छाननी करील आणि कोणत्याही नामनिर्देशनाच्या संदर्भात जे आक्षेप प्राप्त होतील त्या सर्वांवर निर्णय घेईल आणि असे आक्षेप किंवा स्वत:चा प्रस्ताव यापैकी अशा संक्षिप्त चौकशीनंतर त्याला योग्य वाटेल त्याप्रमाणे कोणतेही नामनिर्देशन खालील कोणत्याही कारणास्तव नाकारु शकेल, ती कारणे अशी:-

(अ) अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये जागा भरण्यास अनर्ह ठरविला गेलेला उमेदवार असेल तर,

(ब) नामनिर्देशन पत्रावर स्वाक्षरी करण्यापासून अनर्ह ठरविलेला सूचक असेल तर,

(क) नियम १६ च्या तरतूदीपैकी कोणत्याही एका तरतुदीचे पालन करण्यात कसूर झाली असेल तर,

(ड) नामनिर्देशन पत्रावरील उमेदवाराची किंवा [३]{सूचकाची} स्वाक्षरी खरी नसेल तर,

---

१. अधिसू क्र.जिनीस१०९९/प्रक्र ७२/१४४४ दिनांक ५ मे २००० अन्वये वगळण्यात आला

२. अधिसू क्र.जिनीस१०९९/प्रक्र ७२/१४४४ दिनांक ५ मे २००० अन्वये हा मजकुर अंतर्भूत करण्यात आला

(३) पोट-नियम (२) च्या खंड (क) किंवा (ड) मध्ये अंतर्भूत नसले तरी कोणत्याही उमेदवाराने नामनिर्देशन, नामनिर्देशन पत्रासंदर्भातील कोणत्याही अनियमिततेच्या कारणावरुन, जरी उमेदवार दुस-या नामनिर्देशनपत्रावर, ज्यावर कोणत्याही प्रकारची अनियमित गोष्ट केलेली नसेल, यथोचितरित्या नामनिर्देशित झाला असला तरी, नाकारण्यात आल्याचे मानण्यात येईल.

(४) निर्वाचन अधिकारी कोणतेही नामनिर्देशपत्र महत्वाच्या स्वरुपाची नसेल अशी कोणतीही उणीव, असल्याच्या कारणास्तव नाकारु शकणार नाही.

(५) निर्वाचन अधिकारी कोणतेही नियम १३ अनुसार निश्चित केलेल्या दिनांकाला छाननी करु शकेल आणि ज्यावेळी त्याच्या आवाक्याबाहेरच्या कारणास्तव अशा कामकाजात खंड पडला किंवा अडथळा आणला गेला असेल त्याव्यतिरिक्त कामकाज तहकूब करण्यास मुभा देणार नाही.

परंतु, निर्वाचन अधिका-याकडून किंवा दुस-या एखाद्या व्यक्तीकडून एखादा आक्षेप घेतला गेल्यास संबंधित उमेदवारास निकटच्या दिवसापेक्षा नंतर नसेल अशा रीतीने त्याचे खंडन करण्यास परवानगी देण्यात यावी आणि निर्वाचन अधिकारी ज्या दिवशी कामकाज तहकूब करण्यात आले असेल अशा दिनांकाला त्याचा निर्णय नोंदवून ठेवील.

(६) निर्वाचन अधिकारी नामनिर्देशन पत्र स्वीकारल्याबाबतचा किंवा नाकारण्याबाबतचा निर्णय प्रत्येक नामनिर्देशन पत्रावर पृष्ठांकीत करील आणि नामनिर्देशन पत्र नाकारले असेल तर नमुना दोन-ब मध्ये नाकारल्याबाबतची कारणे थोडक्यात लेखी स्वरुपात नमूद करील.

(७) या नियमाच्या प्रयोजनासाठी संबंधित निर्वाचन क्षेत्राच्या मतदाराच्या यादीतील नोंदीची सादर केलेली प्रमाणित प्रत कोणत्याही मतदारास त्याच्या नावाची नोंद असल्यास, परंतु उमेदवार अनर्ह असल्याचे सिध्द केल्याखेरील निवडणूक लढविण्यासाठी निर्णायक पुरावा असेल.

**२०. विधीग्राहय नामनिर्देशन पत्राची यादी प्रसिध्द करणे-नमुना दोन-क:** - सर्व नामनिर्देशन कागदपत्राची छाननी केल्यानंतर आणि ती स्वीकारण्यात किंवा फेटाळण्यात आल्याची नोंद केल्यानंतर लगेच निर्वाचन अधिकारी ज्यांची नामनिर्देशने स्वीकारण्यात आली आहेत अशा उमेदवारांची यादी तयार करील आणि कोणत्या दिनांकाला व किती वाजता ती यादी अशा रीतीने सूचना फलकावर लावण्यात येईल ते नमूद करुन ती यादी सूचना फलकावर लावील.

**२१. अपील** :- (१) निर्वाचन अधिका-याच्या, नामनिर्देशन पत्र स्वीकारणा-या किंवा फेटाळण-या निर्णयामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही उमेदवारास, निर्वाचन अधिका-याच्या आदेशाविरुध्द नियम २० अन्वये निर्वाचन अधिका-याने स्वीकारलेल्या उमेदवारांची नावे असणारी नोटीस सूचना फलकावर लावल्याच्या दिनांकापासून तीन दिवसाच्या मुदतीत जिल्हाधिका-याकडे अपील दाखल करता येईल आणि तो उमेदवार सामान्यपणे त्याच दिवशी निर्वाचन अधिका-यास अपील दाखल करता येईल आणि तो उमेदवार सामान्यपणे त्याच दिवशी निर्वाचन अधिका-यास अपील विषयक विनंती अर्जाची एक प्रत व त्यात स्वत:स वगळून ज्याची नामनिर्देशन पत्रे स्वीकारण्यात आली असतील अशा उमेदवारांच्या संख्ये इतक्या विनंती अर्जाच्या प्रती पुरवील.

---

१.अधिसू. क्र.जिनीस२०००/प्रक्र ७२/१४४४ दि. ९ एप्रिल २००७ अन्वये असा बदल करण्यात आला
२. अधिसू. क्र.जिनीस१०९९/प्रक्र ७२/१४४४ दि. ५ मे २००० अन्वये असा बदल करण्यात आला

(२) [१][जिल्हाधिकारी अपील मिळाल्याच्या दिनांकापासून ३ दिवसाच्या आत निर्णय घेईल] व केवळ अशा निर्णयास अधीन राहून निर्वाचन अधिका-याच्या, उमेदवाराचे नामनिर्देशन स्वीकारणारा किंवा फेटाळणारा निर्णय हे अंतिम व निर्णायक असतील.

**२२. उमेदवारी मागे घेणे :- (१)** कोणत्याही उमेदवारास:-

(अ) नियम २१ अन्वये कोणतेही अपील दाखल करण्यात आले नसेल तर, नियम २१, पोटनियम (१) यात उल्लेख केलेली मुदत ज्या दिवशी समाप्त होईल त्या दिवसाच्या लगेच पुढच्या दिवशी आणि

(ब) कोणतेही अपील करण्यात आले असेल तर, ज्या दिवशी [१][जिल्हाधिकारी] निर्णय देईल त्या दिवसानंतरच्या लगेच पुढच्या दिवशी नमुना दोन- ड मध्ये त्याने सही केलेल्या व निर्वाचन अधिका-याच्या स्वाधीन केलेल्या लेखी नोटीशीद्वारे आपली उमेदवारी मागे घेता येईल.

(२) उमेदवारी मागे घेण्यासाठी नियम १३ अन्वये निश्चित केलेल्या शेवटच्या दिवशी दुपारी तीन वाजण्याच्या अगोदर अशी नोटीस निर्वाचन अधिका-याच्या स्वाधीन करण्यात येईल.

(३) अशी नोटीस एक तर उमेदवार स्वत: किंवा त्याचा सूचक देऊ शकेल.

(४) पोट-नियम (१) अन्वये आपली उमेदवारी मागे घेण्याची नोटीस दिलेली आहे अशा कोणत्याही व्यक्तीस अशी नोटीस रद्द करण्याची परवानगी दिली जाणार नाही.

(५) उमेदवारी मागे घेण्यासाठी दिलेल्या नोटीशीच्या खरेपणाबद्दल आणि तसेच पोट-नियम (१) अन्वये ती स्वाधीन करणा-या व्यक्तीच्या ओळखीबाबत आपली खात्री करुन घेतल्यावर निर्वाचन अधिकारी आपल्या कार्यालयाच्या सूचना फलकावर अशी नोटीस लावण्याची व्यवस्था करील.

**२३. निवडणूक लढविणा-या उमेदवारांची यादी तयार करणे:-** (१) नियम १३ अन्वये उमेदवारी मागे घेण्यासाठी निश्चित केलेल्या अंतिम दिनांकालगतच्या पुढच्या दिवशी निर्वाचन अधिकारी निवडणूक लढविणा-या उमेदवारांची म्हणजे ज्यांची नामनिर्देशनपत्रे अंतिमरित्या स्वीकारण्यात आली असतील व ज्यांनी निश्चित मुदतीच्या आत आपली उमेदवारी मागे घेतली नसेल अशा उमेदवारांची [१][नियम ५५ मधील तरतुदीनुसार प्रवर्गनिहाय] एक यादी तयार करील व तो नमुना तीन मध्ये प्रसिध्द करील.

(२) पोट-नियम (३) च्या उपबंधास अधीन राहून उक्त यादीत निवडणूक लढविणा-या उमेदवारांची वर्णानुक्रमे मराठीतील नावे आणि नामनिर्देशन पत्रात दिलेले पत्ते यांचा समावेश असेल.

(३) ज्या उमेदवारांना आडनावे असतील अशा उमेदवारांच्या आडनावांनुसार आणि इतर उमेदवारांच्या बाबतीत त्यांच्या खुद्द नांवानुसार पोट-नियम (२) यात उल्लेखिलेला वर्णानुक्रम ठरविण्यात येईल.

[२] ***

---

१. अधिसू.क्र.जिनीस१००७/प्रक्र २२/१४४४ दि. ८ ऑगस्ट २००८ अन्वये अंतर्भूत करण्यात आले.

२.अधिसू.क्र.जिनीस१०९९/प्रक्र ७२/१४४४ दि.५ मे २००० अन्वये पोटनियम (४) (५) व (६) वगळण्यात आले.

३.अधिसू. क्र.जिनीस२०००/प्रक्र ७२/१४४४ दि. ९ एप्रिल २००७ अन्वये येथील काही मजकुर वगळण्यात

**२४. निवडणुक लढविणा-या उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे:-** निवडणूक लढविणा-या उमेदवारांची यादी तयार केल्यानंतर ताबडतोब निर्वाचन अधिकारी अशा यादीची एक प्रत आपल्या कार्यालयातील सूचनाफलकावर लावण्याची व्यवस्था करील आणि अशा यादीची एक प्रत निवडणूक लढविणा-या उमेदवारापैकी प्रत्येक उमेदवारास व मागणी करण्यात आली असता ती त्याच्या निवडणूक प्रतिनिधीस सुध्दा पुरवील.

**२५. निवडणुक प्रतिनिधीची नेमणूक करणे आणि अशी नेमणूक रद्द करणे:-**(१) एखाद्या उमेदवारास निवडणूक प्रतिनिधीची नेमणूक करावयाची असेल तर पोट-नियम (३) च्या उपबंधास अधीन राहून अशी नेमणूक त्याला नमुना तीन-अ नुसार करता येईल. उमेदवार अशा नियुक्तीची नोटीस नामनिर्देशन पत्र तयार करण्याच्या वेळी किंवा त्यानंतर कोणत्याही वेळी, परंतु उमेदवाराच्या निवडणूक खर्चाचा हिशेब दाखल होण्यापूर्वी निर्वाचन अधिका-यास नियुक्तीचे पत्र स्वाधीन करेल किंवा पाठवून देईल.३***

(२) उमेदवारास कोणत्याही वेळी लेखी निवेदनावर स्वत: सही करुन व असे निवेदन नमुना तीन-ब मध्ये निर्वाचन अधिका-याकडे दाखल करुन निवडणूक प्रतिनिधीची नेमणूक रद्द करता येईल. अशा रीतीने नेमणूक रद्द करण्याचा निर्णय हा ज्या तारखेस अशी नेमणूक रद्द करण्यासंबंधीचे निवेदन दाखल करण्यात आले असेल त्या तारखेपासून अंमलात येईल. निवडणूक प्रतिनिधीची नेमणूक अशा रितीने रद्द केली असेल किंवा निवडणुकीच्या मुदतीपूर्वी किंवा मुदतीत निवडणूक प्रतिनिधी मरण पावला तर, उमेदवारास त्याचा निवडणूक प्रतिनिधी म्हणून दुस-या व्यक्तीची नेमणूक करता येईल आणि पहिल्या निवडणूक प्रतिनिधीची नेमणूक ज्या रीतीने करण्यात आली असेल त्याच रीतीने त्याची सूचना निर्वाचन अधिका-यास देण्यात येईल.

---

(३) या नियमानुसार मतदार म्हणून अपात्र ठरविण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीस किंवा जिचे नाव मतदारांच्या यादीत समाविष्ट नाही अशा व्यक्तीस निवडणूक प्रतिनिधी म्हणून नियुक्त करता येणार नाही.

[1] [**२५ (अ) मतदान प्रतिनिधींची नेमणूक करणे आणि अशी नेमणूक रद्द करणे:-** एखाद्या उमेदवारास नमुना तीन-क नुसार प्रत्येक मतदान केंद्रावर एखाद्या व्यक्तीस त्याचा मतदान प्रतिनिधी म्हणून नेमता येईल. तो उमेदवार अशा नेमणुकीची निर्वाचन अधिका-यास लेखी आगाऊ सूचना देईल. मतदान प्रतिनिधींची नेमणूक नमुना तीन -ड नुसार कोणत्याही वेळी उमेदवारास रद्द करता येईल.]

**२६. मतदानापुर्वी उमेदवार मरण पावणे:-** निवडणूक लढविणारा उमेदवार जर मरण पावला आणि त्याच्या मृत्यूचे प्रतिवृत्त निर्वाचन अधिका-यास मतदान सुरु होण्यापूर्वी मिळाले तर असा निर्वाचन अधिकारी उमेदवाराच्या मृत्यूबाबत त्याची खात्री झाल्यानंतर मतदानासंबंधी प्रत्यादेश देईल आणि त्या निवडणूकीच्या संबंधातील कामकाज सर्व बाबतीत नवीन निवडणूक असल्याप्रमाणे नव्याने सुरु करण्यात येईल.

---

१. अधिसू.क्र.जिनीस१०९९/प्रक्र ७२/१४४४ दि.५ मे, २००० अन्वये नियम २५(अ) अंतर्भूत करण्यात आला.

२. अधिसू. क्र.जिनीस२०००/प्रक्र ७२/१४४४ दि.५ मे, २००० अन्वये पोटनियम (२) वगळण्यात आला.

परंतु (अ) मतदानासंबंधी प्रत्यादेश देण्याच्यावेळी जी व्यक्ती निवडणूक लढविणारी उमेदवार होती अशा व्यक्तीच्या बाबतीत आणखी नामनिर्देशन पत्राची आवश्यकता असणार नाही, आणि

(ब) मतदानासंबंधी प्रत्यादेश देण्यापूर्वी जिने नियम २२ अन्वये आपली उमेदवारी मागे घेतल्याबद्दलची नोटीस दिली असेल अशी कोणतीही व्यक्ती, मतदानासंबंधी असा प्रत्यादेश दिल्यानंतर निवडणूकीकरिता उमेदवार म्हणून नामनिर्दिष्ट केली जाण्यास अपात्र असणार नाही.

२७. **बिनविरोध निवडणूका:-** नियम २२ च्या पोट-नियम (२) अन्वये ज्या कालावधीच्या आत उमेदवारी मागे घेता येईल तो कालावधी संपल्यानंतर निर्वाचन क्षेत्रामध्ये ज्या उमेदवारांचे नामनिर्देशन स्विकारण्यात आले आहे, अशा उमेदवारांची संख्या भरण्यात येणा-या उमेदवारा इतकी किंवा त्याहून कमी असेल तर, निर्वाचन अधिकारी तो उमेदवार किंवा असे किंवा असे सर्व उमेदवार त्या जागेसाठी रीतसर निवडून आल्याचे जाहीर करील आणि नमुना चार मधील प्रतिज्ञापत्र पूर्ण करुन प्रमाणित करील.

२८. **निवडणुकीची कार्यपध्दती :-**(१) निवडणूक लढविणा-या विधीग्राहय उमेदवारांची संख्या जर त्यांनी उमेदवारी मागे घेतली नसेल तर भरण्यात येणा-या एकूण जागांपेक्षा जास्त असल्यास जिल्हा नियोजन समितीची सदस्यांच्या निवडणुकीबाबतची या नियमानुसार विहित केलेली कार्यपध्दती अनुसरण्यात यावी.

२***

१[**२९ निवडणुकीतील मतदानाची पध्दत: (१) मतदान घेण्यात येईल** अशा प्रत्येक निवडणुकीत, गुप्त मतदान पध्दतीने मतदान घेण्यात येईल व प्रतिनिधीमार्फत मते घेतली जाणार नाहीत.

(२) मतदारास अशा मतदार संघातून प्रत्येक प्रवर्गातून निवडणूकीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या संख्येइतके पसंतीक्रम देता येतील व एका उमेदवारास एकापेक्षा अधिक पसंतीक्रम देता येणार नाहीत.

(३) मतदाराने पसंतीक्रम जेवढे द्यावयाचे आहेत ते मधील संख्या न वगळता देणे आवश्यक आहे. जर पंसतीचा क्रम वगळल्यास किंवा सारखाच पसंतीक्रम एकापेक्षा अधिक उमेदवारांना दिल्यास त्या व त्या पुढील पसंतीक्रमाच्या मोजणीसाठी त्या मतपत्रीकेचा विचार केला जाणार नाही.

(४) पहिला पसंतीक्रम कोणाही उमेदवारास न दिल्यास किंवा एकापेक्षाअधिक उमेदवारास दिल्यास अशी मतपत्रिका बाद होईल.

(५) मतदाराने उमेदवाराच्या नावापुढे दिलेल्या कंसामध्ये पंसतीक्रम अंकामध्ये मराठी किंवा इंग्रजी मध्ये नमुद करणे आवश्यक आहे. अक्षरामध्ये नमुद केलेले पसंतीक्रम मतमोजणीसाठी ग्राहय धरले जाणार नाहीत.

(६) पसंतीक्रम हे प्राधिका-यांनी त्यासाठी पुरविण्यात आलेल्या साधनानेच नमुद करणे आवश्यक आहेत व अन्य साधनाने नमुद केलेले पसंतीक्रम मोजणीसाठी ग्राहय धरले जाणार नाहीत.]

३०. **मतपेटी:-** प्रत्येक मतपेटी ही जिल्हाधिका-याने मान्य केलेल्या नमुन्याची असेल.

३१. **मतपत्रिकेचा नमुना:-** प्रत्येक निर्वाचन क्षेत्रासाठी १*** निराळी मतपत्रीका असेल.

(१) २[प्रत्येक मतदारसंघामध्ये प्रत्येक प्रवर्गासाठी वेगवेगळया रंगातील एक स्वतंत्र मतपत्रिका असेल. सदर मतपत्रीकेमध्ये पात्र उमेदवारांची नियम ५५ मधील तरतुदीनुसार प्रवर्गनिहाय नांवे असतील.]

(२) निवडणूक लढविणा-या उमेदवारांच्या यादीत ज्या क्रमाने उमेदवारांची नावे असतील

(३) जर दोन किंवा अधिक उमेदवार एकच नाव धारण करीत असतील तर त्यांचा व्यवसाय किंवा राहण्याचे ठिकाण लिहून किंवा इतर रीतीने त्यांच्यात फरक करण्यात येईल.

**३२. मतदान केंद्रावरील व्यवस्था** :- (१) प्रत्येक मतदान केंद्राच्या बाहेर प्रामुख्याने दिसतील अशा प्रकारे खालील गोष्टी प्रदर्शित करण्यात येतील:-

(अ) ज्या मतदान क्षेत्रातील मतदारांना मतदान केंद्रात आणि मतदान केंद्रात एकापेक्षा अधिक मंडप (बूथ) असतील तर, अशा मंडपापैकी प्रत्येक मंडपात मत देण्याचा हक्क असलेले मतदान क्षेत्र आणि अशा मंडपास नेमून देण्यात आलेल्या मतदारांचा तपशील विनिर्दिष्ट करणारी नोटीस.

(ब) निवडणूक लढविणा-या उमेदवारांच्या यादीची एक प्रत.

(२) प्रत्येक मतदान केंद्रात कोणाला न दिसेल अशा रितीने उमेदवारांना आपले मत देता येईल असे एक किंवा अधिक मतदान कक्ष तयार केलेले असतील.

(३) निर्वाचन अधिकारी प्रत्येक मतदान केंद्रात पुरेशा मतपेटया, मतपत्रिका ज्या मतदान क्षेत्रातील किंवा क्षेत्रांतील मतदारांना अशा मतदान केंद्रात मत देण्याचा हक्क असेल अशा मतदान क्षेत्राच्या किंवा क्षेत्रांच्या संबंधातील मतदारांच्या यादीच्या प्रती, मतपत्रिकांवर मुख्य नियमाच्या नियम-३७ च्या पोटनियम (१) च्या खंड (दोन) मध्ये [१][केल्यानुसार मतपत्रीकेवर पसंतीक्रम नमूद करण्यासाठीचे साधन पुरविल.] तसेच निर्वाचन अधिकारी अशा मतदान केंद्रात मतदान घेण्यासाठी आवश्यक असतील अशी इतर साधने व सामग्रीदेखील प्रत्येक मतदान केंद्रात पुरवील.

**३३. मतदान केंद्रात प्रवेश**:- मतदान केंद्राध्यक्ष कोणत्याही एका वेळी मतदान केंद्रात प्रवेश द्यावयाच्या मतदारांची संख्या नियमित करील आणि खालील व्यक्तीखेरीज इतर सर्व व्यक्तींना तेथून बाहेर काढील:-

(अ) मतदान अधिकारी

(ब) निवडणूकीच्या संबंधात कामावर हजर असलेले लोकसेवक,

(क) निर्वाचन अधिका-याने प्राधिकृत केलेल्या व्यक्ती,

(ड) उमेदवार, त्यांचे निवडणूक प्रतिनिधी/ [२][मतदान प्रतिनिधी]

(ई) मतदारांच्या सोबत असलेले कडेवरील मूल,

(फ) जो मदतीशिवाय हालचाल करु शकत नाही अशा आंधळया किंवा अपंग मतदारासोबत असलेली व्यक्ती,

(ग) नियम ३५ च्या पोट-नियम (१) अन्वये निर्वाचन अधिकारी किंवा मतदान केंद्राध्यक्ष मतदारांची ओळख पटविण्याच्या उद्देशाने नियुक्त करील अशा इतर व्यक्ती.

---

१ अधिसू. क्र.जिनीस१०९९/प्रक्र २/१४४४ दि. ५ मे २००० अन्वये "वेगवेगळया रंगातील" हे शब्द वगळण्यात आले.

२. अधिसू.क्र.जिनीस१००७/प्रक्र २२/१४४४ दि. ८ ऑगस्ट २००८ अन्वये अंतर्भूत करण्यात आले.

३. अधिसू.क्र.जिनीस१००७/प्रक्र २२/१४४४ दि. ८ ऑगस्ट २००८ अन्वये असा बदल करण्यात आला.

४ अधिसू. क्र.जिनीस... /प्रक्र ... दि.९ एप्रिल ... अन्वये हे शब्द अंतर्भूत करण्यात

**३४. मतदानासाठी मतपेटया तयार करणे:-** (१) मतपेटया सुरक्षित करण्याकरिता जेव्हा एखादी कागदाची मोहर उपयोगात आणली असेल तेव्हा मतदान केंद्राध्यक्ष कागदाच्या मोहोरेवर आपली स्वत:ची सही करील आणि तेथे हजर असलेल्या मतदान प्रतिनिधीपैकी ज्यांना आपली सही करण्याची इच्छा असेल त्यांच्या सहया त्यावर घेईल.

(२) त्यानंतर मतदान केंद्राध्यक्ष अशा रीतीने सही केलेली कागदाची मोहोर, त्यासाठी मतपेटीत ठेवण्यात आलेल्या जागेवर लावील आणि त्यानंतर मतपत्रिका मतपेटीत टाकण्यासाठी असलेली फट उघडी राहील अशा रीतीने ती मतपेटी सुरक्षित व मोहोरबंद करील.

(३) मतपेटी सुरक्षित करण्याकरिता वापरलेली मोहोर अशा रितीने लावण्यात येईल की, ती पेटी बंद केल्यानंतर, ती मोहोर तोडल्याशिवाय ती पेटी उघडणे शक्य होणार नाही.

(४) मतपेटी सुरक्षित करण्याकरिता कागदाच्या मोहोरा वापरण्याची आवश्यकता नसेल तेव्हा मतपत्रिका टाकण्यासांठी असलेली फट उघडी राहील अशा रीतीने मतदान केंद्राध्यक्ष मतपेटी सुरक्षित व मोहोरबंद करील आणि हजर असलेल्या मतदान प्रतिनिधींची तशी इच्छा असेल तर त्यांना आपल्या मोहोरा लावण्याची परवानगी देईल.

(५) मतदान केंद्रात वापरण्यात येणा-या प्रत्येक मतपेटीला आतील व बाहेरील अशा दोन्ही बाजूंना पुढील गोष्टी नमूद केलेल्या खुणाचिठ्ठया लावण्यात येतील.

(अ) निर्वाचन क्षेत्राचे नाव आणि कोणताही असल्यास अनुक्रमांक,

(ब) मतदान केंद्राचा अनुक्रमांक व नाव

(क) मतपेटीचा अनुक्रमांक (हा मतदानाच्या शेवटी केवळ मतपेटीच्या बाहेरील खूण चिठ्ठीवर लिहावा) आणि

(ड) मतदानाची तारीख.

(६) मतदान सुरु होण्याच्या निकटपूर्वी, मतदान केंद्राध्यक्ष मतदान प्रतिनिधींना व उपस्थित असलेल्या इतर व्यक्तींना मतपेटी रिकामी असल्याचे व पोट-नियम (५) मध्ये उल्लेखिलेल्या खूण-चिठ्ठया लावल्या असल्याचे प्रत्यक्ष दाखवील.

(७) त्यानंतर मतपेटी बंद करण्यात येईल, मोहोरबंद करण्यात येईल व सुरक्षित करण्यात येईल आणि ती मतदान केंद्राध्यक्ष व मतदान प्रतिनिधी यांच्या पूर्णपणे दृष्टिसमोर राहील अशा ठिकाणी ठेवण्यात येईल.

**३५. मतदाराची ओळख पटविणे:-** (१) प्रत्येक मतदार त्याला सक्षम प्राधिका-याने म्हणजे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, नगर परिषदेचे किंवा नगर पंचायतीचे मुख्य अधिकारी किंवा महानगरपालिकेचे आयुक्त यांनी दिलेले ओळखपत्र सादर करील.ओळखपत्रावर त्याचे छायाचित्र, नाव व स्वाक्षरी असेल.

(२) मतदान केंद्रातील केंद्राध्यक्ष मतदाराची ओळख ओळखपत्राच्या सहाय्याने पटवील.

(३) मतपत्रिका मिळण्याचा एखाद्या व्यक्तीचा हक्क ठरविताना यथास्थिती मतदान केंद्राध्यक्ष किंवा मतदान अधिकारी ज्याच्या संबंधी एखादी नोंद केलेली आहे, तो मतदार म्हणजेच ती व्यक्ती होय अशी त्याची खात्री करण्यासाठी ओळखपत्रावरील छायाचित्र आणि स्वाक्षरी याच्याशी ताडून पाहील.

**३६. मतपत्रिका देणे :-** (१) मतदानास सुरुवात होण्यापूर्वी निश्चित केलेल्या वेळेपूर्वी कोणत्याही मतदारास मतपत्रिका देण्यात येणार नाही.

(२) मतदान बंद होण्याच्या वेळी मतदान केंद्रावर जे मतदार हजर असतील अशा मतदारांव्यतिरिक्त इतर कोणत्याही मतदारास मतदान बंद करण्याकरिता निश्चित केलेल्या वेळेनंतर कोणतीही मतपत्रिका देण्यात येणार नाही.

(३) मतपत्रिका मतदारास देण्यापूर्वी (अ) प्रत्येक मतपत्रिकेच्या मागील बाजूस, जिल्हाधिकारी निदेश देईल असा विशिष्ट खुणेसा ठसा उमटविण्यात येईल, आणि (ब) तिच्या मागील बाजूवर मतदान केंद्राध्यक्ष आपली संपूर्ण स्वाक्षरी करील.

(४) मतदारास मतपत्रिका देतेवेळी मतदान अधिकारी मतपत्रिकेचा अनुक्रमांक मतदारांच्या यादीतील मतदारांच्या नावासमोर त्यासाठी अलगपणे ठेवलेल्या मतदारांच्या यादीमध्ये नमूद करील.

(५) पोट-नियम (४) मध्ये उपबंधित केलेल्या बाबी सोडून मतदान केंद्रातील कोणतीही व्यक्ती विशिष्ट मतदारांस दिलेल्या मतपत्रिकांच्या अनुकमांकाची नोंद घेणार नाही.

**३७. मतदान केंद्राच्या कक्षेतील मतदारांनी मतदानाची पाळावयाची गुप्तता व मतदान कार्यपध्दती-**

(१) मतपत्रिका मिळाल्यानंतर मतदार तावडतोब:-

(एक) मतदानकक्षापैकी एका मतदान कक्षाकडे जाईल,

(दोन) १[त्याला ज्या उमेदवारास पसंतीक्रम देण्याची इच्छा असेल त्या उमेदवाराच्या नावापुढे दिलेल्या जागेमध्ये त्यासाठी पुरविण्यात आलेल्या साधनाने पसंतीक्रम नमूद करील.]

(तीन) आपले मत गुप्त राखण्यासाठी मतपत्रिकेची घडी करील.

२***

(चार) घडी केलेली मतपत्रिका मतदानपेटीत टाकील आणि

(पाच) मतदान केंद्रातून निघून जाईल.

(२) दुसरा मतदार मतदान कक्षात असताना कोणत्याही मतदारास तेथे प्रवेश देता येणार नाही.

**३८. मतदान ३[करण्याचा अधिकार]:-** प्रत्येक मतदारास, तो ज्या निर्वाचन क्षेत्रासाठी आहे अशा ठिकाणी मत देण्याचा अधिकार आहे.

४***

---

१ अधिसू.क्र.जिनीस१००७/प्रक्र २२/१४४४ दि. ८ ऑगस्ट २००८ अन्वये अंतर्भूत करण्यात आले.

२ अधिसू. क्र.जिनीस२०००/प्रक्र ७२/१४४४ दि.९ एप्रिल २००७ अन्वये खंड(चार) वगळण्यात आला व खंड (पाच) व खंड(सहा) चे नांमांकन खंड(चार) व (पाच) असे करण्यात आले.

३ अधिसू. क्र.जिनीस२०००/प्रक्र ७२/१४४४ दि.९ एप्रिल २००७ अन्वये असा बदल करण्यात आला.

५ अधिसू.क्र.जिनीस१०९९/प्रक्र ७२/१४४४ दि. ५ मे २००० अन्वये असा बदल करण्यात आला.

**३९. अंध किंवा अपंग मतदारांची मत नोंवणी :-** (१) निरक्षरतेमुळे किंवा अंधत्वामुळे अथवा इतर शारीरिक अपंगत्वामुळे एखादा मतदार मतपत्रिकेवरील १[नावे वाचण्यास ] अथवा मदतीशिवाय त्यावर १[पसंतीक्रम नमुद करण्यास] असमर्थ असेल तर मतदान केंद्राध्यक्ष मतपत्रिकेवरील त्यांच्या वतीने आणि त्याच्या इच्छेनुसार १[पसंतीक्रम नमुद करण्यासाठी ]आणि आवश्यक असल्यास १[पसंतीक्रम] न दिसेल अशा रीतीने मतपत्रिकेची घडी घालण्यासाठी आणि ती मतपेटीत टाकण्यासाठी मतदारांच्या यादीतील मतदारा व्यतिरिक्त अठरा वर्षांहून कमी वय नसणा-या एखाद्या सोबत्याला त्याच्याबरोबर मतदान कक्षाकडे नेण्यासाठी मतदारास परवानगी देईल.

परंतु त्याच दिवशी कोणत्याही मतदान केंद्रावर एकापेक्षा अधिक मतदारांचा सोबती म्हणून कोणत्याही व्यक्तीस परवानगी देण्यात येणार नाही.

परंतु, आणखी असे की, या नियमान्वये कोणत्याही व्यक्तीस एखाद्या मतदाराचा सोबती म्हणुन कार्य करण्यास परवानगी देण्यापूर्वी तिने मतदाराच्या वतीने नोंदविलेले १[पसंतीक्रम ] तो गुप्त राखील आणि त्याच दिवशी तिने कोणत्याही मतदान केंद्रावर इतर कोणत्याही मतदारासाठी सोबती म्हणून काम केलेले नाही असे नमुना सहा मध्ये जाहीर करण्यास तिला भाग पाडण्यात येईल.

(२) मतदान केंद्राध्यक्ष या नियमाखाली केलेल्या कार्यवाहीची नोंद नमुना सहा-अ मध्ये ठेवील.

**४०. खराब झालेल्या व परत केलेल्या मतपत्रिका:-** (१) ज्या कोणत्याही मतदाराने अनवधानाने आपली मतपत्रिका अशा रीतीने वापरली असेल की मतपत्रिका म्हणून तिचा सोईस्कर रीतीने वापर करणे शक्य नसेल तर, त्या मतदाराने ती मतपत्रिका मतदान केंद्राध्यक्षाकडे परत केल्यावर व आपल्या अनवधानामुळे ही गोष्ट घडली अशी त्याची खात्री पटविल्यावर त्याला दुसरी मतपत्रिका देण्यात येईल आणि अशा रीतीने परत केलेल्या मतपत्रिकेवर "खराब झालेली-रद्द केलेली मतपत्रिका" असा शेरा मतदान केंद्राध्यक्षाकडून लिहिण्यात येईल.

(२) मतपत्रिका मिळाल्यानंतर एखाद्या मतदाराने तिचा उपयोग न करण्याचे ठरविले तर तो ती मतदान केंद्राध्यक्षाकडे परत करील आणि अशा रीतीने परत केलेल्या मतपत्रिकेवर "परत केलेली-रद्द केलेली मतपत्रिका" असा शेरा मतदान केंद्राध्यक्षाकडून लिहिण्यात येईल.

(३) पोट-नियम (१) किंवा पोट-नियम (२) अन्वये रद्द केलेल्या सर्व मतपत्रिका एका वेगळया पाकीटात ठेवण्यात येतील.

२***

---

१. अधिसू.क्र.जिनीस१००७/प्रक्र २२/१४४४ दि. ८ ऑगस्ट २००८ अन्वये असा बदल करण्यात आला.

२. अधिसू.क्र.जिनीस१००७/प्रक्र २२/१४४४ दि. ८ ऑगस्ट २००८ अन्वये नियम (४१) वगळण्यात आला.

३ अधिसू. क्र.जिनीस२०००/प्रक्र ७२/१४४४ दि.९ एप्रिल २००७ अन्वये अंतर्भूत करण्यात आले.

**४२. मतदान बंद करणे :-**(१) मतदान बंद करण्याच्या बाबतीत ठरविण्यात आलेल्या वेळी मतदान केंद्राध्यक्ष मतदान केंद्र बंद करील व त्यानंतर तो कोणत्याही मतदारास मतदान केंद्रात प्रवेश देणार नाही.

परंतु, मतदान केंद्र, बंद होण्यापूर्वी तेथे हजर असलेल्या सर्व मतदारांना आपली मते देण्यास परवनागी देण्यात येईल.

(२) मतदान केंद्र बंद होण्यापूर्वी एखादा मतदार तेथे उपस्थित होता किंवा कसे असा प्रश्न उद्भवल्यास मतदान केंद्राध्यक्ष त्याबाबत निर्णय देईल आणि त्याचा निर्णय अंतिम असेल.

**४३. मतदानानंतर मतपेट्या मोहोरबंद करणे:-** (१) मतदान बंद झाल्याबरोबर शक्य तितक्या लवकर मतदान केंद्राध्यक्ष कोणत्याही उमेदवाराच्या किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीच्या [1][किंवा मतदान प्रतिनिधीच्या] समक्ष मतपेटीची फट बंद करील आणि फट बंद करण्याकरिता मतपेटीत कोणतीही यांत्रिक कळ नसेल तेव्हा तो ती फट मोहोरबंद करील व हजर असलेल्या कोणत्याही मतदान प्रतिनिधीस देखील त्याची मोहोर लावण्याची परवानगी देईल.

(२) त्यानंतर मतपेटी मोहोरबंद करुन ती सुरक्षित करण्यात येईल.

(३) पहिली मतपेटी भरल्यामुळे जेव्हा दुस-या मतपेटीचा उपयोग करणे आवश्यक असेल तेव्हा दुस-या मतपेटीचा उपयोग करण्यापुर्वी पोट-नियम (१) व (२) यात तरतूद केल्याप्रमाणे पहिली मतपेटी बंद करण्यात येईल, मोहोरबंद करण्यात येईल व सुरक्षित केली जाईल.

**४४. मतपत्रिकांचा हिशोब:-** (१) मतदान संपल्यावर मतदान केंद्राध्यक्ष नमुना आठ मध्ये मतपत्रिकांचा हिशोब तयार करील व तो एका वेगळया पाकीटात ठेऊन त्यावर "मतपत्रिकांचा हिशोब." असे शब्द लिहिल.

(२) मतपत्रिकांच्या हिशोबात केलेल्या नोंदीची सत्य प्रत घेण्याची ज्या [1][निवडणूक प्रतिनिधीची किंवा] मतदान प्रतिनिधीची इच्छा असेल त्यास ती घेण्यास मतदान केंद्राध्यक्ष परवानगी देईल आणि सत्य प्रत म्हणून ती साक्षांकित करील.

**४५. इतर पाकिटे मोहोरबंद करणे :-** (१) मतदान केंद्राध्यक्ष त्यानंतर पुढील निरनिराळी पाकीटे तयार करील :- (अ) खुणा केलेली मतदारांच्या यादीची प्रत,

(ब) वापरण्यात न आलेल्या मतपत्रिका,

(क) रद्द केलेल्या मतपत्रिका,

[2]***

(इ) आक्षेप घेतलेल्या मतांची यादी आणि

(फ) निर्वाचन अधिका-यांच्या निदेशानुसार मोहोरबंद पाकीटात ठेवावयाची इतर कागदपत्रे.

(२) असे प्रत्येक पाकीट मतदान केंद्राध्यक्ष आणि उपस्थित असलेल्या मतदान प्रतिनिधीपैकी ज्यांची त्यावर मोहोर लावण्याची इच्छा असेल त्यांची मोहोर लावून मोहोरबंद करण्यात येईल.

---

१ अधिसूचना क्र.जिनीस२०००/प्रक्र ७२/१४४४ दि.९ एप्रिल, २००७ अन्वये अंतर्भूत करण्यात आले.

२ अधिसू.क्र.जिनीस२०१०/प्रक्र ३३/१४४४ दि.८ ऑगस्ट, २००८ अन्वये खंड (ड) वगळण्यात आला.

**४६. मतपेटया वगैरे निर्वाचन अधिका-याकडे पाठविणे:-** मतमोजणी सुरु होईपर्यंत निर्वाचन अधिकारी सर्व मतपेटया, पाकीटे व इतर कागदपत्रे यांच्या सुरक्षित परिवहनासाठी व त्यांच्या सुरक्षित अभिरक्षेसाठी पुरेशी व्यवस्था करील.

**४७. मतपेटयांचा नाश वगैरे झाल्याच्या बाबतीत नव्याने मतदान घेणे:-** (१) कोणत्याही निवडणुकीत जर-**(अ)** एखाद्या मतदान केंद्रावर वापरण्यात आलेली कोणतीही मतपेटी मतदान केंद्राध्यक्षाच्या किंवा निर्वाचन अधिका-याच्या ताब्यातून अवैधरित्या काढून घेण्यात आली किंवा मतदान केंद्रावरील मतदानाचा निकाल निश्चित ठरविणे अशक्य होईल इतक्या प्रमाणात तिची नासधूस करण्यात आली किंवा तिच्यात ढवळाढवळ करण्यात आली , किंवा **(ब)** मतदान केंद्रावरील कार्यपध्दतीत, जिच्यामुळे मतदानावर अनिष्ट परिणाम होण्याची शक्यता असेल अशी कोणतीही चूक किंवा नियमबाह्यता घडली असेल, तर निर्वाचन अधिकारी ती गोष्ट ताबडतोब [१][जिल्हाधिका-यामार्फत] शासनास कळवील.

(२) शासन, असा अहवाल प्राप्त झाल्यानंतर पोटनियम(१) मधील सर्व महत्वाची परिस्थिती विचारात घेऊन एकतर-**(अ)** त्या मतदान केंद्रावरील मतदान निरर्थक असल्याचे जाहीर करील. त्या मतदान केंद्रावर नव्याने मतदान घेण्यासाठी एखादा दिवस ठरवील व वेळ ठरवील आणि अशा रीतीने ठरविलेला दिवस व ठरविलेला वेळ त्यास योग्य वाटेल अशा रितीने जाहीर करील किंवा **(ब)** त्या मतदान केंद्रावरील नवीन मतदानाच्या निकालाचा निवडणुकीच्या निकालावर कोणत्याही प्रकारे अनिष्ट परिणाम होणार नाही किंवा नियमबाह्यता महत्वाची नाही अशी त्याची खात्री झाली तर, निवडणुकीसाठी त्यास योग्य वाटेल अशी कार्यवाही करण्यास निर्वाचन अधिका-यास निदेश देईल.

(३) या अधिनियमाच्या आणि त्या अन्वये केलेले कोणतेही नियम किंवा त्याखाली केलेले उपविधी ज्याप्रमाणे मूळ मतदानास लागू होतात त्याप्रमाणेच ते अशा प्रत्येक नव्याने घेतलेल्या मतदानासही लागू होतील.

**४८. मतमोजणीसाठी ठरविलेल्या जागेत प्रवेश :-** (१) निर्वाचन अधिकारी पुढील व्यक्तीखेरीज इतर सर्व व्यक्तींना मतमोजणीसाठी ठरविलेल्या जागेतून बाहेर काढील:-

**(अ)** मतमोजणीच्या कामात त्याला सहाय्य करण्यासाठी तो नेमील अशा (मतमोजणी पर्यवेक्षक आणि मतमोजणी [१][सहाय्यक] म्हणून ओळखल्या जावयाच्या) व्यक्ती, **(ब)** शासनाने प्राधिककृत केलेल्या व्यक्ती, **(क)** निवडणुकीच्या संबंधात कामावर उपस्थित असलेले लोकसेवक आणि **(ड)** उमेदवार] त्यांचे निवडणूक प्रतिनिधी व मतमोजणी प्रतिनधी.

[२]***

(२) कोणत्या निवडणूक प्रतिनिधीने [३][किंवा मतमोजणी प्रतिनिधीने] मतमोजणीच्या विशिष्ट टेबलाकडे किंवा मतमोजणीच्या टेबलांच्या गटाकडे लक्ष ठेवावे ते निर्वाचन अधिकारी ठरवील.

---

१ अधिसू. क्र.जिनीस२०००/प्रक्र ७२/१४४४ दि.५ मे २००० अन्वये "प्रतिनिधी"या शब्दाऐवजी असा बदल करण्यात आला

२ अधिसू. क्र.जिनीस२०००/प्रक्र ७२/१४४४ दि.९ ,एप्रिल २००७ अन्वये हा पोटनियम(२) वगळून पोटनियम (३) व (४) चे क्रमांक अनुक्रमे (२) व (३) असे बदलण्यात आले.

३ अधिसू. क्र.जिनीस२०००/प्रक्र ७२/१४४४ दि.९ ,एप्रिल २००७ अन्वये अंतर्भूत करण्यात आले

(३) जी व्यक्ती मतमोजणी चालू असताना स्वत: गैरवर्तन करील किंवा निर्वाचन अधिका-याचे वैध निदेश पाळण्यात कसूर करील अशा कोणत्याही व्यक्तीस जेथे मतमोजणीचे काम चालू असेल अशा जागेतून निर्वाचन अधिका-याकडून किंवा कमावर असलेल्या कोणत्याही पोलीस अधिका-याकडून किंवा निर्वाचन अधिका-याने याबाबतीत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीकडून बाहेर घालविण्यात येईल.

१[**४८(अ) मतमोजणी प्रतिनिधीची नेमणूक करणे व अशी नेमणूक रद्द करणे:-** उमेदवारास, मतमोजणीच्या ठिकाणी, त्याचा मतमोजणी प्रतिनिधी म्हणून एखाद्या व्यक्तीची, नमुना आठ (१) मध्ये नेमणूक करता येईल. उमेदवार, अशा नेमणुकीबाबत निर्वाचन अधिकाऱ्यास लेखी आगाऊ सूचना देईल. मतमोजणी प्रतिनिधीची अशी नेमणूक, उमेदवाराला/निवडणूक प्रतिनिधीला नमुना आठ (२) मध्ये सूचना देऊन, कोणत्याही वेळी, रद्द करता येईल.]

**४९. मतपेटयांची छाननी आणि त्या उघडणे:-** (१) निर्वाचन अधिकारी एकाच वेळी एकापेक्षा अधिक मतदान केंद्रात वापरलेली किंवा वापरलेल्या मतपेटी किंवा मतपेटया उघडील आणि अशी मतपेटी किंवा मतपेटया यामध्ये आढळून एकूण मतपत्रिकांची मोजणी करील.

(२) मतमोजणीच्या टेबलावर कोणतीही मतपेटी उघडण्यापूर्वी त्या टेबलाजवळ उपस्थित असलेल्या मतमोजणी प्रतिनिधींना कागदाची मोहोर किंवा तिला लावली असेल अशी इतर मोहोर तपासू देण्यात येईल किंवा ती जशीच्या तशी असल्याबाबत खात्री करू देण्यात येईल.

(३) वस्तुत: कोणत्याही मतपेटीत ढवळाढवळ करण्यात आलेली नाही याविषयी निर्वाचन अधिकारी स्वत:ची खात्री करुन घेईल.

(४) कोणत्याही मतपेटीमध्ये खरोखर अनधिकृतपणे फिरवाफिरव केली असल्याबद्दल निर्वाचन अधिका-याची खात्री झाली तर तो त्या मतपेटीत असणा-या मतपत्रिकांची मोजणी करणार नाही आणि त्या मतदान केंद्राबाबत नियम ४७ मध्ये घालून दिलेली कार्यपध्दती अनुसरील.

**५०. मतपत्रिकांची छाननी करणे व नाकारणे :- (१)** प्रत्येक मतपेटीमधून काढण्यात आलेल्या मतपत्रिका सोयीस्कर गठ्ठयात लावण्यात येतील व त्यांची छाननी करण्यात येईल.

(२) निर्वाचन अधिकारी पुढील कारणास्तव मतपत्रिका नाकारील-

(अ) ज्यामुळे मतदार ओळखता येईल अशी खूण किंवा मजकूर मतपत्रिकेवर असेल किंवा

१[(ब) पहिला पसंतीक्रम एकापेक्षा अधिक उमेदवारांना दिला असेल तर किंवा कोणालाही दिला नसेल तर किंवा अक्षरांमध्ये पसंतीक्रम नमुद केला असेल तर किंवा

(क) नमुद केलेला पहिला पसंती क्रम नेमका कोणत्या उमेदवाराच्या नावापुढे नमुद केलेला आहे याबाबत संभ्रम निर्माण झाल्यास किंवा एकाच उमेदवारास एकापेक्षा अधिक पसंती क्रम दिल्यास पहिल्या पसंती क्रमाबरोबरच त्याच उमेदवारासमोर अन्य पसंती क्रम नमुद केल्यास किंवा]

(ड) ती मतपत्रिका बनावट असेल किंवा

---

१.अधिसू.क्र.जिनीस२००७/प्रक्र २२/१४४४ दि. ८ ऑगस्ट २००८ अन्वये असा बदल करण्यात वगळण्यात

(इ) ती खरीखुरी मतपत्रिका असल्याबद्दल निश्चितपणे सिध्द करता येणार नाही इतक्या प्रमाणात तिची नासधूस झाली असेल किंवा ती खराब झाली असेल किंवा

(फ) एखाद्या मतपत्रिकेवर त्या मतदान केंद्रात वापरण्यासाठी अधिकृत केलेल्या मतपत्रकांचे अनुक्रमांक किंवा यथास्थिती त्यांचा नमुना याहून वेगळा अनुक्रमांक असेल किंवा ती वेगळया नमुन्याची असेल किंवा

(ग) त्यावर नियम [१][३६] पोट-नियम (३) च्या उपबंधान्वये पाहिजे असलेले चिन्ह नसेल तर,

परंतु, (एक) खंड (फ) किंवा (ग) मध्ये निर्दिष्ट केलेला कोणताही दोष मतदान केंद्राध्यक्षाने किंवा मतदान अधिका-याने केलेल्या कोणत्याही चुकीमुळे किंवा त्याने एखादी गोष्ट न केल्यामुळे उत्पन्न झाला आहे अशी निर्वाचन अधिका-याची खात्री झाली तर, असा दोष आहे केवळ याच कारणावरुन ती मतपत्रिका नाकारण्यात येणार नाही, [१](दोन) ज्या प्रकारे मतपत्रिकेवर पसंतीक्रम नमुद केला असेल त्यावरुन विशिष्ट उमेदवाराला पसंतीक्रम देण्याचा इरादा स्पष्टपणे दिसून येत असेल तर पसंतीक्रम दर्शविणारा अंक अस्पष्ट आहे किंवा एकाहून अधिक वेळा अंक नमुद केला आहे, केवळ याच कारणावरुन ती मतपत्रिका नाकारण्यात येणार नाही.]

(३) पोट-नियम (२) अनव्ये कोणतीही मतपत्रिका नाकारण्यापूर्वी निर्वाचन अधिकारी उपस्थित असलेल्या प्रत्येक निवडणूक प्रतिनिधीस [१][किंवा मतमोजणी प्रतिनिधीस] मतपत्रिकेची तपासणी करण्याची वाजवी संधी देईल.

(४) निर्वाचन अधिकारी तो बाद करील अशा प्रत्येक मतपत्रकेवर "आर" हे अक्षर आणि संक्षिप्त स्वरुपात ती बाद करण्याची कारणे स्वत:च्या अक्षरात किंवा रबरी शिक्याने नोंदवील.

(५) हया नियामान्वये नाकारण्यात आलेल्या सर्व मतपत्रिका एका गठ्ठयात बांधून ठेवण्यात येतील.

**५१. मतमोजणीची कार्यपध्दती :-(१)** मतमोजणी निर्वाचन अधिका-याकडून आणि त्याच्या देखरेखीखाली तो मतमोजणीस सहाय्य करण्यासाठी तो नियुक्त करील अशा व्यक्तींच्या सहाय्याने केली जाईल.

(२) मतमोजणीकरिता प्रत्येक मतपेटी उघडल्यानंतर अवैध आणि शंकास्पद मतपत्रिकांतून स्पष्टपणे वैध असलेल्या मतपत्रिका वेगळया करण्यात येतील. अवैध आणि शंकास्पद मतपत्रिका निर्णयाकरिता निर्वाचन अधिका-यांना सादर करण्यात येतील आणि प्रत्येक [१][उमेदवाराच्या] बाजूने [१][नोंदविलेले पसंतीक्रम], मतमोजणीच्या कामात सहाय्य करण्याकरिता नियुक्त केलेल्या व्यक्तीच्या सहाय्याने मोजण्यात येतील.

---

१. अधिसू.क्र.जिनीस२००७/प्रक्र २२/१४४४ दि. ८ ऑगस्ट २००८ अन्वये असा बदल करण्यात आला.
२. अधिसू.क्र.जिनीस२००७/प्रक्र २२/१४४४ दि. ८ ऑगस्ट २००८ अन्वये पोटनियम (१) खंड (अ) ते (र) सहीत अंतर्भूत करण्यात आले.

(३) निर्वाचन अधिकारी, जो उमेदवार किंवा त्यांचे निवडणूक प्रतिनिधी [१][किंवा मतमोजणी प्रतिनिधी] उपस्थित असतील त्यांना, निर्वाचन अधिका-यांच्या मतानुसार नाकारण्यास पात्र असलेल्या सर्व मतपत्रिका तपासण्याची वाजवी संधी देईल, परंतु त्या किंवा इतर कोणत्याही मतपत्रिका हाताळण्यास मुभा देणार नाही. निर्वाचन अधिकारी नाकारण्यात आलेली प्रत्येक मतपत्रिका "आर" या अक्षराने पृष्ठांकित करील. जर उमेदवार किंवा त्याचा निवडणूक प्रतिनिधी यांनी कोणतीही मतपत्रिका नाकारण्याच्या अचूकतेबाबत प्रश्न उपस्थित केला, तर निर्वाचन अधिकारी सुध्दा अशा मतपत्रिकेवर ती नाकारण्यात आल्याची कारणे थोडक्यात नोंदवील.

**५२. मतमोजणीची पध्दत**:-१[(अ) मतपत्रिकांच्या छाननीनंतर, वैध व अवैध मतपत्रिकांचे वेगवेगळे गठ्ठे तयार करण्यात येतील. त्यानंतर वैध मत पत्रिकांची विभागणी निवडणूक लढविणा-या उमेदवारामध्ये पहिल्या पसंतीच्या मतानुसार करण्यात येईल. प्रत्येक उमेदवाराला मिळालेल्या पहिल्या पसंतीच्या मतांच्या मतपत्रिकांचा गठ्ठा करण्यात येईल. अशा गठ्ठयातील मतपत्रिकांची संख्या मोजून त्याची नोंद नमुना - दहा मध्ये ठेवण्यात येईल. (ब) **मताचे मुल्य** :- (१) ज्या निवडणुकीमध्ये एकच जागा भरावयाची आहे अशावेळी प्रत्येक मतपत्रिकेचे मुल्य प्रत्येक मोजणीच्या वेळी "एक" समजण्यात येईल.

(२) ज्यावेळी एकापेक्षा अधिक जागा भरावयाच्या असतात त्यावेळी एका वैध मतपत्रिकेचे मुल्य १०० असेल.

(क) **निवडून येण्यासाठी आवश्यक मताचा कोटा ठरविणे** :- (१) ज्या निवडणुकीमध्ये एकच जागा भरावयाची आहे अशावेळी खालील प्रमाणे आवश्यक मतांचा कोटा परिगणित करण्यात येईल.

$$\text{आवश्यक कोटा} = \frac{\text{एकूण वैध मते}}{२} + १$$

(२) ज्यावेळी एकापेक्षा अधिक उमेदवार निवडून द्यावयाचे असतील त्यावेळी खालील प्रमाणे किमान आवश्यक मतांचा कोटा ठरविण्यात येईल.

$$\text{आवश्यक कोटा} = \frac{\text{एकूण वैध मते} \times १००}{\text{निवडून द्यावयाचे उमेदवार} + १} + १$$

**टिप**:- भागाकार करून अपुर्णांक वगळुन पूर्णांकात आलेली संख्या कोटा निश्चितीसाठी घेण्यात यावी.

(ड) पहिल्या पसंतीच्या मतपत्रिकांची मोजणी केल्यानंतर जे उमेदवार आवश्यक कोटयाइतकी किंवा त्यापेक्षां अधिक मतें मिळवतील त्यांना निवडून आल्याचे प्रथम घोषित करण्यात येईल. ज्यावेळी जितक्या जागा भरावयाच्या आहेत तितके उमेदवार पहिल्या फेरीतच निवडून आल्यास पुढील मतमोजणी करण्याची आवश्यकता राहणार नाही.

(इ) प्रत्येक मतमोजणीच्या फेरीनंतर किंवा वगळलेल्या उमेदवारांची मते हस्तांतरित केल्यानंतर जे उमेदवार आवश्यक कोटयाइतकी किंवा त्यापेक्षा अधिक मते मिळवतील त्यांना निवडून आल्याचे घोषित करण्यात येईल.

(फ) जेथे एकच जागा भरावयाची आहे आणि पहिल्या फेरीत कोणताही उमेदवार निवडून न आल्यास, ज्या उमेदवारांना सर्वात कमी मते मिळालेली आहेत त्यांना क्रमाक्रमाने वगळून त्याची मते अन्य उमेदवारांना दुस-या व त्यापुढील पसंतीनुसार हस्तांतरीत करण्यात येतील. ज्या मतपत्रिकेमध्ये पसंतीक्रमांक क्रमाने नमुद केलेला नसेल किंवा योग्य रितीने नमुद केलेला नसेल किंवा ज्या मतपत्रिकेवर एकच पसंती क्रम एकापेक्षा अनेक उमेदवारांना दिला असेल तर सदर मतपत्रिका पुढील मतमोजणीसाठी संपलेली आहे असे समजण्यात येईल.

(ग) ज्या निवडणुकीमध्ये एकापेक्षा अधिक जागा भरावयाच्या असतील तेथे प्रथम मतमोजणी फेरीनंतर जितक्या जागा भरावयाच्या आहेत तितके उमेदवार निवडून न आल्यास प्रथम मतमोजणीमध्ये ज्या उमेदवारांना आवश्यक कोटयापेक्षा अधिक मते मिळालेली आहेत त्याची अतिरिक्त मते निवडून न आलेल्या उमेदवारांना पसंती क्रमानुसार वाटण्यात येतील. अशा वेळी ज्यांची अधिकची मते जास्त आहेत त्या क्रमाने त्या सर्व उमेदवारांची अधिकची मते हस्तांतरीत करण्यात येतील. परंतु प्रथम मतमोजणीच्या फेरीच्या वेळची अधिकची मते विभागल्यानंतरच दुस-या किंवा त्यानंतरच्या मतमोजणी फेरीमध्ये अधिकची मते मिळविलेल्या उमेदवारांची मते विभागण्यात येतील.

(ह) ज्यावेळी एकापेक्षा अधिक उमेदवारांवी अधिकची मते हस्तांतरित करावयाची असतात आणि ज्यावेळी दोन किंवा त्यापेक्षा अधिक उमेदवारांना समान अधिकची मते मिळाली असल्यास, अशावेळी त्या उमेदवारांची मूळ मते लक्षात घ्यावीत व ज्या उमेदवारांची मूळ मते अधिक आहेत, त्या उमेदवाराची अधिकची मते प्रथम हस्तांतरित करावीत आणि ज्यावेळी मूळ मते ही समान असतील अशावेळी मतमोजणी अधिकारी चिठ्ठया टाकून कोणाची अधिकची मते प्रथम हस्तांतरित करायची याचा क्रम ठरविल.

(ई) ज्यावेळी पहिल्या पसंतीच्या मूळ मतातील अधिकची मते हस्तांतरित करावयाची, असतात, त्यावेळी अधिकच्या मतांच्या संख्येला न संपलेल्या मतपत्रिकेच्या संख्येने भागुन मताचे मुल्य ठरविण्यात यावे. याप्रमाणे आलेल्या मुल्यानुसार ती पुढील पसंतीप्रमाणे निवडून न आलेल्या उमेदवारांना हस्तांतरित होतील.

ज) प्रत्येक मतमोजणी फेरीनंतर उप गठ्ठयातील न संपलेल्या मतपत्रिकांचे मुल्य ठरविण्यात येईल.

(च) ज्यावेळी न संपलेल्या मतपत्रिकांचे मुल्य अधिकच्या मताइतके किंवा त्यापेक्षा कमी असेल त्यावेळी अशा न संपलेल्या मतपत्रिका ज्या मुल्याने ती अधिकची मते मिळविणा-या उमेदवाराला मिळाली असतील, त्याच मतमुल्याने ती पुढील उमेदवारांना हस्तांतरित होतील.

(ल) ज्यावेळी न संपलेल्या मतपत्रिकांचे मुल्य अधिकच्या मतांच्या मुल्यापेक्षा जास्त असेल त्यावेळी अशा मतपत्रिकांचे मुल्य हे अधिकच्या मताला एकूण न संपलेल्या मतपत्रिकांच्या संख्येने भागुन येणा-या भागाकाराइतके असेल व त्या मतपत्रीका त्या मुल्याने पंसतीनुसार पुढील उमेदवारास हस्तांतरीत होतील.

(म) ज्यावेळी ज्या उमेदवाराची अधिकची मते ही हस्तांतरित व मूळ मते यांच्यामधुन

(न) प्रत्येक उमेदवाराला हस्तांतरित झालेल्या मतपत्रिका हया उप गठ्ठयाच्या स्वरूपात मूळ मतपत्रिकांना नव्याने समाविष्ट करण्यात येतील.

(व) निवडून आलेल्या उमेदवारांच्या गठ्ठा व उप गठ्ठायातील हस्तांतरित होऊ न शकलेल्या सर्व मतपत्रिका वेगळया ठेवण्यात येतील व त्यांचा नंतर विचार करण्यात येईल.

(प) **कमी मते मिळविणा-या उमेदवारांना वगळणे** :-(१) सर्व उमेदवारांची अधिकची मते हस्तांतरीत केल्यानंतरही निवडून द्यावयाच्या उमेदवारांच्या संख्येइतके उमेदवार निवडून न आल्यास, निर्वाचन अधिकारी सदर निवडून न आलेल्या उमेदवारांमधून सर्वात कमी मते मिळालेल्या उमेदवारांस क्रमाक्रमाने वगळेल आणि त्यांची मते इतर निवडून न आलेल्या उमेदवारांमध्ये पुढील पसंती क्रमानुसार विभागून देईल आणि संपलेल्या मतपत्रिका वेगळया ठेवील.

(२) वगळलेल्या उमेदवारांची मूळ मते १०० मुल्यांनी हस्तांतरित होतील.

(३) वगळलेल्या उमेदवारांना हस्तांतरित झालेली मते त्यांना ज्या क्रमाने हस्तांतरित झाली त्या क्रमाने व ज्या मुल्याने त्यांना मिळाली होती त्याच मुल्याने पुढे हस्तांतरित होतील.

(४) प्रत्येक हस्तांतरण हे वेगळे हस्तांतरण समजण्यात येईल, परंतु त्यास वेगळी मतमोजणी फेरी समजण्यात येणार नाही.

(५) मतांच्या हस्तांतरणामुळे एखाद्या उमेदवाराने कोटयाइतकी किंवा त्यापेक्षा अधिक मते प्राप्त केल्यानंतर त्यांची मोजणी पूर्ण होईल व त्यानंतर त्यांना पुढील मते हस्तांतरित करण्यात येणार नाहीत.

(६) जोपर्यंत अपेक्षित मतमुल्य प्राप्त करून किंवा पुढील खंडात स्पष्ट केलेल्या पध्दतीनुसार अपेक्षित संखेइतके उमेदवार निवडून येत नाहीत तोपर्यंत वरील नियमानुसार विहित केलेल्या पध्दतीने निवडणुकीच्या यादीत सर्वात कमी मते मिळविणा-या उमेदवारांना वगळण्याची कार्यवाही क्रमाक्रमाने करण्यात येईल,

(७) ज्यावेळी दोन किंवा अधिक उमेदवारांना समप्रमाणात सर्वात कमी मते मिळाली आहेत, त्यावेळी ज्या उमेदवाराला पहिल्या पसंतीची मते सर्वात कमी मिळाली आहेत त्या उमेदवाराला प्रथम वगळण्यात येईल, तथापि जर पहिल्या पसंतीची मतमुल्ये समान असतील तर मूळ फेरीनंतरच्या पुढील ज्या फेरीत मतमुल्ये असमान होतील त्या फेरीत सर्वात कमी मतमुल्ये मिळालेल्या उमेदवारास प्रथम वगळण्यात येईल.

(८) जर दोन किंवा अधिक उमेदवारांना वरीलप्रमाणे सर्वच मोजण्यांमध्ये सारखीच मते मिळाली असतील तर चिठ्ठया टाकून कोणाला वगळावे याबाबत निर्वाचन अधिकारी निर्णय घेतील.

(र) **शेवटची जागा भरणे** :- (१) ज्या मतमोजणी नंतर निवडून द्यावयाच्या संख्येइतकेच उमेदवार शिल्लक राहिल्यास सर्व उमेदवार निवडून आल्याचे घोषित करण्यात येईल.

(२) ज्या मतमोजणीच्या फेरीनंतर फक्त एकच जागा भरावयाची शिल्लक राहिल्यास व एखाद्या उमेदवारास मिळालेली मते ही इतर निवडून न आलेल्या सर्व उमेदवारांच्या एकूण मते आणि हस्तांतरित न केलेली मते यांच्या संख्येपेक्षा जास्त असतील तर त्या उमेदवाराला निवडून आल्याचे घोषित करण्यात येईल.

(३) ज्या मतमोजणीच्या फेरीनंतर फक्त एकच जागा भरावयाची शिल्लक राहिल्यास आणि फक्त दोनच उमेदवार शिल्लक राहिल्यास व दोघांनाही सारखीच मते मिळाली असल्यास, तसेच

(४) एखाद्या उमेदवारास मिळालेली मते ही इतर निवडून न आलेल्या सर्व उमेदवारांच्या एकूण मते आणि हस्तांतरित न केलेल्या मतांच्या संख्येपेक्षा जास्त असतील तर त्या उमेदवाराला निवडून आल्याचे घोषित करण्यात येईल.

(२) उपयोगात आणलेल्या सर्व मतपेटयांतील सर्व मतपत्रिकांची मतमोजणी पूर्ण झाल्यांनतर निर्वाचन अधिकारी मोजणी केलेल्या मतपत्रिका आणि नाकारण्यात आलेल्या मतपत्रिका यांची स्वतंत्र पाकीटे तयार करुन ती वर्णानासह पृष्ठांकित करुन मोहोरबंद करील.

(३) निर्वाचन अधिकारी मतमोजणीचे काम व्यवहार्य असेल तेथवर सतत चालू ठेवील आणि मतमोजणीचे काम स्थगित करावयाचे असेल अशा कोणत्याही मध्यल्या कालावधीत मतपत्रिका, पाकीटे, निवडणूकी संबंधीची इतर कागदपत्रे यावर स्वत:ची मोहोर लावून आणि त्या उमेदवारांना किंवा निवडणूक प्रतिनिधींना आपली मोहोर लावण्याची इच्छा असेल त्यांची मोहोर लावून ती मोहोरबंद करुन ठेवील आणि त्यांच्या सुरक्षित अभिरक्षेसंबंधी पुरेशी खबरदारी घेण्याची व्यवस्था करील.

(४) मतदान केंद्रावर वापरण्यात आलेल्या सर्व मतपेटयांमध्ये असलेल्या सर्व मतपत्रिकांची मोजणी पूर्ण केल्यानंतर निर्वाचन अधिकारी प्रत्येक उमेदवारास मिळालेली एकूण मते नोंदविलेले एकत्रीकृत विवरणपत्र तयार करील.

**५३. फेर मतदानानंतर मतमोजणी पुन्हा चालू करणे:-** (१) नियम ४७ अन्वये पुन्हा मतदान घेण्यात आले तर निर्वाचन अधिकारी ते मतदान पूर्ण झाल्यानंतर मतमोजणीसाठी त्याने ती तारीख व वेळ आणि जे ठिकाण ठरविले असेल व ज्या संबंधीची नोटीस आधी उमेदवारांना व त्यांच्या निवडणूक प्रतिनिधींना देण्यात आली असेल अशा तारखेस, वेळी व अशा ठिकाणी मतमोजणी पुन्हा चालु करील.

(२) नियम ४०, ४४ व ४७ चे उपबंध हे शक्य असेल तेथवर अशा पुढील मतमोजणीस लागू होतील.

**५४. फेर मतमोजणी:-** (१) [१][मतमोजणीची प्रत्येक फेरी] पूर्ण झाल्यानंतर निर्वाचन अधिकारी नमुन-नऊ मधील निकालपत्रात प्रत्येक [१][उमेदवार कोणत्या क्रमाने /फेरीत निवडून आला व वगळण्यात आला त्याची क्रमवारी] जाहीर करील.

(२) अशा रीतीने जाहीर करण्यात आल्यानंतर [२][व पुढील मोजणी सुरू होण्याअगोदर], उमेदवारास किंवा त्याच्या अनुपस्थितीत त्याच्या निवडणूक प्रतिनिधीस [१][किंवा मतमोजणी प्रतिनिधीस] पूर्वी मोजणी करण्यात आलेल्या सर्व किंवा कोणत्याही मतपत्रिकांची फेरमोजणी [१][पुर्वीच्या हस्तांतरणामध्ये व इतर कोणत्याही कारणाने अंतिमरीत्य बाजुला ठेवलेल्या मतपत्रीका वगळून] करण्याबद्दल निर्वाचन अधिका-याकडे अर्ज करता येईल व त्या अर्जात, त्याने ज्या मुद्यावरुन अशा फेरमोजणीसाठी अर्ज केला असेल ते मुद्दे नमूद करावेत.

---

१. अधिसू.क्र.जिनीस१००७/प्रक्र २२/१४४४ दि. ८ ऑगस्ट २००८ अन्वये असा बदल करण्यात आला.

२. अधिसू.क्र.जिनीस१००७/प्रक्र २२/१४४४ दि. ८ ऑगस्ट २००८ अन्वये अंतर्भूत करण्यात आले.

(३) असा अर्ज करण्यात आल्यानंतर निर्वाचन अधिकारी त्याबाबतीत निर्णय देईल आणि त्यास असा अर्ज संपूर्णत: किंवा अंशत: मंजूर करता येईल किंवा जर त्यास उक्त अर्ज क्षुल्लक किंवा गैरबाजवी असल्याचे दिसून आला तर तो संपूर्णत: नाकारण्यात येईल.

(४) पोट-नियम (३) अन्वये निर्वाचन अधिका-याने दिलेला प्रत्येक निर्णय हा लेखी राहील आणि त्यामध्ये त्याबद्दलची कारणे नमूर करण्यात येतील.

(५) पोट-नियम (३) अन्वये जर निर्वाचन अधिका-याने असा अर्ज संपूर्णत: किंवा अंशत: मंजूर करण्याचे ठरविले तर तो (अ) आपल्या निर्णयानुसार मतपत्रिकांची पुन्हा मोजणी करील. (ब) अशा फेरमोजणीनंतर आवश्यक असेल त्या मर्यादेपर्यंत नमुना-नऊ मधील निकालपत्रात सुधारणा करील आणि (क) अशा रीतीने केलेल्या सुधारणा जाहीर करील.

(६) पोट-नियम (१) किंवा पोट-नियम (५) अन्वये प्रत्येकास [१][उमेदवार कोणत्या क्रमाने/फेरीत निवडून आला व वगळण्यात आला हे प्रत्येक फेरीनंतर] मिळालेली एकूण मते जाहीर करण्यात आल्यानंतर निर्वाचन अधिकारी नमुना-नऊ मधील निकालपत्र पूर्ण करुन त्यावर सही करील आणि त्यानंतर फेर मोजणीसाठी कोणताही अर्ज दाखल करुन घेण्यात येणार नाही.

> परंतु, मतमोजणी पूर्ण होण्याचे वेळी उपस्थित असलेले उमेदवार व निवडणूक प्रतिनिधी यांना पोट-नियम (२) अन्वये देण्यात आलेला अधिकार अंमलात आणण्यासाठी वाजवी संधी देण्यात येईपर्यंत मतमोजणीचे काम पूर्ण झाल्यावर या पोट-नियमान्वये कोणतीही उपाययोजना करण्यात येणार नाही.

[२][**५५.निवडणूकीचा निकाल जाहीर करणे:-** १) निर्वाचन अधिका-याने प्रत्येक उमेदवाराची वैध मते नोंदविल्यानंतर खालील वर्गवारी व क्रमानुसार निवडून आलेल्या उमेदवारांचे नाव जाहीर करण्यात येईल.

(अ) अनुसूचित जाती (स्त्रिया)
(ब) अनुसूचित जाती
(क) नागरिकांचा मागासवर्ग (स्त्रिया)
(ड) नागरिकांचा मागासवर्ग
(इ) अनुसूचित जमाती
(ग) सर्वसाधारण (स्त्रिया)
(ह) सर्वसाधारण ]

[३]***

---

१ अधिसू.क्र.जिनीस१००७/प्रक्र २२/१४४४ दि. ८ ऑगस्ट, २००८ अन्वये असा बदल करण्यात आला.

२ अधिसूचना क्र.जिनीस१०९९/प्रक्र ७२/१४४४ दि. ५ मे, २००० अन्वये असा बदल करण्यात आला.

३ अधिसू.क्र.जिनीस१००७/प्रक्र २२/१४४४ दि. ८ ऑगस्ट, २००८ अन्वये पोटनियम (२) वगळण्यात आला.

(३) राखीव प्रवर्गातील महिला उमेदवार, महिलांसाठी राखीव असलेल्या सर्वसाधारण जागेकरिता निवडणूक लढविण्यास पात्र असेल.

(४) कोणत्याही राखीव प्रवर्गाचा उमेदवार सर्वसाधारण जागेकरिता निवडणूक लढविण्यास पात्र असेल.

(५) एखाद्या विशिष्ट प्रवर्गासाठी महिला उमेदवार उपलब्ध नसेल तर अशा प्रवर्गाची जागा त्या प्रवर्गातील [१][अनुरुप उमेदवार उपलब्ध होईपर्यंत रिक्त राहिल.]

(६) जर कोणत्याही राखीव प्रवर्गासाठी पात्र उमेदवार उपलब्ध नसल्यास ती जागा [१][अनुरुप उमेदवार उपलब्ध होईपर्यंत रिक्त राहिल.]

**५६. समितीवर निवडून आलेल्या सदस्यांची नावे प्रसिध्द करणे:-** (१) निर्वाचन अधिकारी निवडून आलेल्या सर्व समिती सदस्यांच्या नावाची त्यांच्या कायम पत्त्यासह आणि ज्या निर्वाचन क्षेत्रामधून ते निवडून आले आहेत त्या निर्वाचन क्षेत्राच्या नावासह यादी तयार करुन सूचना फलकावर किंवा त्यांच्या कार्यालयातील कोणत्याही ठळक जागी लावून नावे प्रसिध्द करील.

(२)[१][जिल्हाधिकारी,] निवडून आलेल्या सर्व समिती सदस्यांची एक यादी शासनास पाठवील.

**५७. निवडणुकीसंबंधी कागदपत्रांची अभिरक्षा:-** निर्वाचन अधिकारी नियम ४५ मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेली पाकिटे आणि निवडणुकीसंबंधीची इतर सर्व कागदपत्रेही अभिरक्षेत ठेवील.

**५८. निवडणूक विषयक कागदपत्रे सादर करणे व त्याची तपासणी :-** (१) निर्वाचन अधिका-याच्या अभिरक्षेत असताना **(अ)** न वापरलेल्या मतपत्रिकांची पाकिटे, **(ब)** वापरण्यात आलेल्या मतपत्रिकांची पाकिटे, मग त्या वैध असोत, [२]*** किंवा नकारण्यात आलेल्या असोत, **(क)** मतदार यादीच्या खुणा केलेल्या प्रतीची पाकिटे उघडण्यात येणार नाहीत आणि आयुक्त किंवा न्यायालय किंवा इतर सक्षम प्राधिकारी यांच्या आदेशाशिवाय कोणत्याही व्यक्तीकडून किंवा प्राधिका-याकडून उक्त पाकीटातील मजकुराची तपासणी करण्यात येणार नाही किंवा त्याजपुढे सादर करण्यात येणार नाही.

(२) निवडणुकीतील इतर सर्व कागदपत्रे लोकांना पाहण्यासाठी खुली असतील.

**५९. निवडणूक विषयक कागदपत्रांची विल्हेवाट लावणे:-** (१) नियम ५७ मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेली पाकीटे एक वर्षापर्यंत ठेवण्यात येतील आणि त्यानंतर ती आयुक्तांनी किंवा न्यायालयाने किंवा इतर सक्षम प्राधिका-याने तद्विरुध्द कोणताही निदेश दिला असल्यास, त्यास अधीन राहून नष्ट करण्यात येतील.

(२) निवडणुकी संबंधातील इतर सर्व कागदपत्रेही ती ज्या निर्वाचन क्षेत्रासंबंधी असतील त्या निर्वाचन क्षेत्रासाठी पुढील निवडणूका संपेपर्यंत राखून ठेवण्यात येतील आणि त्यानंतर ती आयुक्तांनी किंवा न्यायालयाने किंवा इतर सक्षम प्राधिका-याने तद्विरुध्द कोणताही निदेश दिला असल्यास, त्यास अधीन राहून नष्ट करण्यात येतील.

---

१.अधिसू. क्र.जिनीस२०००/प्रक्र ७२/१४४४ दि.९ ,एप्रिल २००७ अन्वये असा बदल करण्यात आला.

२.अधिसू.क्र.जिनीस१००७/प्रक्र २२/१४४४ दि. ८ ऑगस्ट २००८ अन्वये "प्रदत्त असोत" हे शब्द वगळण्यात आले.

**६०. तात्पुरत्या रिकाम्या झालेल्या जागा कशा भराव्यात:-** मृत्यू, राजीनामा, अनर्हता या कारणांमुळे जागा रिक्त झाल्याप्रसंगी समितीचा सदस्य सचिव ताबडतोब जागा रिक्त झाल्याचे [१][शासनाला] कळवील आणि अशी रिक्त जागा पोटनिवडणूक घेऊन त्याच पध्दतीने भरली जाईल.

**६१. निवडणूकीची विधिग्राह्यता ठरविणे:-** (१) या नियमानुसार व अधिनियमानुसार केलेली किंवा करण्यात येणारी मतदारांची यादी किंवा निर्वाचित क्षेत्रामधील जागांचे केलेले वाटप याबाबत कोणत्याही न्यायालयात विधिग्राह्यतेबाबत हरकत घेता येणार नाही.

(२) जी व्यक्ती निवडून येण्यासाठी किंवा निवडणूकीच्या वेळी मत देण्यासाठी पात्र असेल अशा एखाद्या व्यक्तीने समितीच्या उमेदवाराच्या पोटनिवडणूकीसह निवडणुकीच्या विधीग्राह्यतेबाबत शंका उपस्थित केली तर अशी व्यक्ती निवडणुकीचा निकाल जाहीर झालेल्या दिनांकापासून ७ दिवसांचे आत आयुक्ताकडे लेखी स्वरुपात अर्ज करु शकेल.

(३) पोट नियम [१][(२)] अन्वये अर्ज प्राप्त झाल्यावर विभागीय आयुक्त अर्जदारास त्याचे म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर आणि त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर निवडणुकीचा जाहीर केलेला निकाल कायम केल्याचे किंवा सुधरित केल्याचे किंवा निवडणूक रद्द केल्याचा आदेश देईल जर विभागीय आयुक्तांनी निवडणूक रद्द केली तर ते शक्य होईल तितक्या लवकर नव्याने निवडणुका घेण्याची तारीख निश्चित करतील.

(४) विभागीय आयुक्तांच्या निर्णयामुळे आपल्यावर अन्याय झाला आहे, असे समजणारी एखादी व्यक्ती त्याला निर्णय कळविल्याच्या तारखेपासून सात दिवसांचे आत अशा निर्णयाविरुध्द राज्य शासनाकडे अपील करु शकेल आणि अपिलातील शासनाच्या निर्णयाच्या अधीन राहून विभागीय आयुक्तांचा अंतिम राहील.

**६२. निवडणूकीच्या वैधतेबाबत आव्हान देणा-या पक्षांचे अर्ज:-** निवडणूकीच्या वैधतेबाबत आव्हान देणारे अर्ज केले जातील त्याबाबतीत अर्जदार खालील अर्ज न केलेल्या व्यक्तींना संलग्न करुन घेऊ शकेल:-

(अ) जेथे अर्जदार सर्व किंवा कोणत्याही पराभूत उमेदवारांची निवडणूक निरर्थक असल्याचा प्रतिज्ञापूर्वक दावा करीत असेल त्याशिवाय तो स्वत: किंवा इतर कोणताही उमेदवार निवडून आल्याचा प्रतिज्ञापूर्वक आणखी दावा करीत असेल तर अर्जदाराव्यतिरिक्त सर्व निवडणूक लढविणारे उमेदवार आणि जेथे असा कोणताही पुढील प्रतिज्ञापूर्वक दावा केला नसेल तर सर्व पराभूत उमेदवार आणि

(ब) ज्या उमेदवाराविरुध्द भ्रष्टाचाराचे आरोप अर्जामध्ये केले असतील असे कोणताही इतर उमेदवार.

---

१ अधिसूचना क्र.जिनीस२०००/प्रक्र ७२/१४४४ दि.९ एप्रिल, २००७ अन्वये असा बदल करण्यात आला.

[1][नमुना एक]

(नियम ५ (१) पहा)

**मतदार यादी**

------------------------- जिल्हा नियोजन समिती

------------------------- निर्वाचन क्षेत्र

| अ.क्र. | सदस्याचे नाव | लिंग | वय | पदावधी | ज्या प्रभागातून निवडून आला त्याचे आरक्षण | ओळखपत्र क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | | | | | | |
| २ | | | | | | |
| ३ | | | | | | |
| ४ | | | | | | |

मतदार यादी प्रसिद्ध केल्याचा दिनांक:-

ठिकाण : जिल्हाधिकारी

दिनांक :

**पदावधी- सदस्याचा संबंधित स्थानिक प्राधिकरणामधील पदावधी.**

---

१ अधिसूचना क्र.जिनीस १०९९/प्रक्र ७२/१४४४ दि.५ मे २००० अन्वये हा नमुना अंतर्भूत करण्यात आला.

**नमुना एक अ**

**(नियम १३ पहा)**

**निवडणुकीची सूचना**

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की :-

(१) ------------------------------------ या ग्रामीण/मोठया नागरी/लहान नागरी/नगर पंचायत मतदार संघाकरिता जिल्हा नियोजन समितीच्या सदस्यांची निवड करण्यासाठी निवडणूक घेण्यात यावयाची आहे, किंवा

(१) जिल्हा परिषद/नगर परिषद/नगर पंचायत यांच्या निवडून आलेल्या सदस्यांकडून ------------- च्या ------------------------- चे सदस्य निवडून देण्यासाठी घेण्यात यावयाची निवडणूक

(२) नामनिर्देशन पत्रे -------------------------- पेक्षा उशिरा नसेल अशा कोणत्याही दिवशी (सार्वजनिक सुटीचा दिवस वगळून) सकाळी ११ ते दुपारी ३ च्या दरम्यान ------------------------- - येथे

--------------------------------- च्या निवडणूक निर्णय अधिका-याकडे ----------------------- सहायक निवडणूक निर्णय अधिका-याकडे उमेदवारास किंवा त्याच्या [1] [सूचकास ] देता येतील.

(३) नामनिर्देशन पत्राचे नमुने उपरोक्त ठिकाणी व वेळी प्राप्त होतील.

(४) नामनिर्देशन पत्रे ------------------------------ येथे ------------------- रोजी ------------- ----------- छाननीसाठी हाती घेण्यात येतील.

(५) उमेदवारी मागे घेतल्याची सूचना उमेदवार किंवा त्याचा सूचक किंवा त्याचा निवडणूक प्रतिनिधी (अशी सूचना पाठविण्यासाठी उमेदवाराने ज्याला लेखी स्वरुपात प्रधिकृत केले आहे असा) एकतर वरील परिच्छेदामध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या अधिका-याकडे, त्याच्या कार्यालयात ------------------------ रोजी दुपारी ३.०० पूर्वी पाठवील.

(६) निवडणूक लढावयाची असेल अशा प्रसंगी मतदान ---------------- रोजी ------------------ या वेळेत घेण्यात येईल.

ठिकाण :

निर्वाचन अधिकारी.

दिनांक :

---------------------------------------------------------------------------------

१.अधिसू.क्र.जिनीस१००७/प्रक्र २२/१४४४ दि. ८ ऑगस्ट २००८ अन्वये असा बदल करण्यात आला.

**१[नमुना दोन]**

(नियम १५ (२) पहा)

## नामनिर्देशन पत्र

## जिल्हा नियोजन समितीची निवडणूक

मी, ग्रामीण/मोठया नागरी/लहान नागरी/नगर पंचायत ---------------------------------------- मतदार संघातून जिल्हा नियोजन समितीच्या निवडणुकीसाठी उमेदवार म्हणून नामनिर्देशन करीत आहे.

उमेदवाराचे नाव --------------------------------------------------------------------------------

वडिलाचे/आईच/पतीचे नाव ----------------------------------------------------------------------

त्यांचा टपालाचा (पोस्टाचा पत्ता )---------------------------------------------------------------

त्यांचे नाव ------------------------------ जिल्हयाच्या ग्रामीण/मोठया नागरी/लहान नागरी/ नगर पंचायत याच्या मतदार यादीचा भाग क्र. ------------------ मधील अनुक्रमांक ----------------वर नोंदविले आहे.

माझे नांव ---------------------------------------------------------------------- आहे आणि ते ---------------------------------------------- जिल्हयाच्या ग्रामीण / मोठया नागरी / लहान नागरी / नगर पंचायत मतदार संघाकरिता असलेल्या मतदार यादीच्या भाग क्रमांक ---------- अनुक्रमांक -------------- वर नोंदविले आहे.

दिनांक

२ [(सूचकाची स्वाक्षरी )]

---

------------------ ३***

मी वर नमूद केलेला उमेदवार या नामनिर्देशनास संमती देतो आणि असे घोषित करीत आहे की,

(अ) मी ---------------------------- वर्षे वयाचा /वयाची आहे.

(ब) माझे नाव आणि माझ्या (वडिलांचे/आईचे/पतीचे नांव) यांचा अचूक तपशील --------------- -------------- या भाषेत (भाषेचे नाव) वर दिला आहे.

(क) माझ्या संपूर्ण माहितीप्रमाणे व विश्वासाप्रमाणे जिल्हा नियोजन समितीतील जागा भरण्यासाठी निवडला जाण्यास मी अर्हताप्राप्त आहे व अनर्ह नाही.

---

१ अधिसूचना क्र.जिनीस२०००/प्रक्र ७२/१४४४ दि.५ मे २००० अन्वये हा नमुना अंतर्भूत करण्यात आला.

२ अधिसूचना क्रमांक जिनिस-१००७/प्र.क्र.२२/का.१४४४, दि. ८ ऑगस्ट, २००८ अन्वये असा बदल करण्यात आला.

३ अधिसूचना क्र.जिनीस२०००/प्रक्र ७२/१४४४ दि.९ ,एप्रिल २००७ अन्वये काही मजकुर वगळण्यात आला.

मी आणखी असे घोषित करितो/करिते की, मी ----------------- या राज्यातील -------------------- (क्षेत्राच्या) संबंधातील जी ------------------- या राज्याची अनुसूचित जात/जमात आहे त्या ------------------------------- जातीचा/जमातीचा सदस्य आहे.

दिनांक (उमेदवाराची स्वाक्षरी)

---

**(निर्वाचन अधिका-याने भरावयाचे)**

नामनिर्देशन पत्राचा अनुक्रमांक ------------------------------------------------------------------

हे नामनिर्देशन पत्र --------------------------- रोजी (दिनांक)-----------वाजता (वेळ)

उमेदवाराने/प्रस्तावकाने -----------------------------------येथील कार्यालयात माझ्या स्वाधीन केले.

ठिकाण : (निर्वाचन अधिकारी)

दिनांक :

# नमुना दोन -अ

(नियम १८ पहा)

## नामनिर्देशन पत्राबद्दलची माहिती आणि छाननीबाबतची नोटीस

**(नामनिर्देशनपत्र सादर करणा-या व्यक्तीच्या स्वाधीन करावयाचे)**

**नामनिर्देशनपत्राचा अनुक्रमांक** ------------------------ ग्रामीण/मोठया नागरी/लहान नागरी/नगर पंचायत ---------------------- मतदार संघातील निवडणुकीसाठी असलेले उमेदवार ------------------------ यांचे नामनिर्देशन पत्र -------------- रोजी ----------------- वाजता उमेदवाराने/सूचकाने ------------------येथील माझ्या कार्यालयात माझ्या स्वाधीन केले, सर्व नामनिर्देशनपत्रांची छाननी --------------वाजता(वेळ) ------------------रोजीं (दिनांक)---------- ------------------------------------------------ ठीकाणी येथे करण्यात येईल.

ठिकाण :

निर्वाचन अधिका-याची सही.

दिनांक :

[1][नमुना दोन अ (१)]

(नियम १८ पहा)

**नामनिर्देशनपत्र [illegible] मतदार उमेदवारांची यादी**

---------------------- जिल्हा नियोजन समिती

---------------------- मतदारसंघ

[1][------------------प्रवर्ग]

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव | उमेदवाराचा पत्ता | [3][ सूचकाचे नांव] |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | | | |

ठिकाण : 

निर्वाचन अधिकारी

दिनांक :

टीप:-प्रत्येक निर्वाचन क्षेत्रातुन निवाडुन द्यावयाच्या उमेदवारांची प्रवर्गनिहाय (पुरूष व महिलासह) यादी स्वतंत्र असेल.

---

१ अधिसूचना क्र.जिनीस १०९९/प्रक्र ७२/१४४४ दि.५ मे २००० अन्वये हा नमुना समाविष्ट करण्यात आला.

२ अधिसूचना क्र.जिनीस२०००/प्रक्र ७२/१४४४ दि.९ एप्रिल २००७ अन्वये हे समाविष्ट करण्यात आले तसेच तक्त्यातील "स्तंभ"-२ " मतदार संघाचे नांव " हा स्तंभ वगळण्यात आला व पुढील स्तंभाचे अनुक्रमांक बदलण्यात आले.

३ अधिसूचना क्रमांक जिनिस-१००७/प्र.क्र.२२/का.१४४४, दि.८ ऑगस्ट, २००८ अन्वये असा बदल करण्यात आला.

## नमुना दोन ब

(नियम-१९ चा पोट-नियम (६) पहा)

## नामनिर्देशनपत्र स्वीकारल्याचा किंवा ते नाकारल्याचा निर्वाचन अधिकाऱ्याचा निर्णय

मी, या नामनिर्देशपत्राची, महाराष्ट्र नियोजन समिती (निवडणूक) नियम, १९९९ याच्या नियम १९(६) अनुसार तपासणी केली आहे आणि त्याबाबत पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे :-

ठिकाण : निर्वाचन अधिकारी

दिनांक :

[1][नमुना दोन -क]

(नियम क्र. २० पहा)

**वैध नामनिर्देशनांची यादी**

-------------------------- जिल्हा नियोजन समितीची निवडणुक

-------------------------- मतदार संघ

[2][-------------------प्रवर्ग]

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | (वडिलांचे/आईचे/पतीचे)नाव | उमेदवाराचा पत्ता |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | | | |

ठिकाण : निर्वाचन अधिकारी

दिनांक :

---

१ अधिसूचना क्र.जिनीस२०००/प्रक्र ७२/१४४४ दि.५ मे २००० अन्वये हा सुधारत नमुना समाविष्ट करण्यात आला.

२ अधिसूचना क्र.जिनीस२०००/प्रक्र ७२/१४४४ दि.९ एप्रिल २००७ अन्वये प्रवर्ग या शब्दाचा समावेश करण्यात आला.

**नमुना दोन -ड**
(नियम २२ पहा)
**उमेदवारी मागे घेण्याची नोटीस**
---------------------------------------- जिल्हा नियोजन समितीची निवडणूक

प्रति,

निर्वाचन अधिकारी,

-------------------

मी, ------------------------------------------------------ (वरील निवडणूकीसाठी वैधरित्या नामनिर्देशित उमेदवार)

याद्वारे अशी नोटीस देतो की, माझी उमेदवारी मागे घेतली आहे.

ठिकाण :

वैधरित्या नामनिर्देशित उमेदवाराची स्वाक्षरी

दिनांक :

ही नोटीस -------------------------------- यांच्याद्वारे ------------------------------ रोजी (दिनांक) ----------------- वाजता (वेळ) उमेदवाराने/सूचकाने ------------------------ येथील माझ्या स्वाधीन केली होती.

दिनांक : निर्वाचन अधिकारी

---

**उमेदवारी मागे घेण्याच्या नोटीसीची पावती**
(नोटीस स्वाधीन करणा-या व्यक्तीला द्यावयाची)

------------------------------- जिल्हा नियोजन समितीच्या निवडणुकीसाठी ------------------ (वैधरित्या नामनिर्देशित उमेदवार) यांच्याकडून उमेदवारी मागे घेण्याची नोटीस ------------------ रोजी (दिनांक) ----------------- वाजता (वेळ) ------------------------------- येथील माझ्या कार्यालयात माझ्या स्वाधीन केली.

दिनांक : निर्वाचन अधिकारी.

## [1][नमुना तीन]

(नियम २३ (१) पहा)

### उमेदवारांची यादी

------------------------------------ जिल्हा नियोजन समितीची निवडणूक

------------------------- मतदारसंघ

[2][--------------------प्रवर्ग]

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | उमेदवाराचा पत्ता |
|---|---|---|
| १ | | |
| २ | | |
| ३ | | |
| ४ | | |

ठिकाण : निर्वाचन अधिकारी

दिनांक :

---

१ अधिसूचना क्र.जिनीस२०००/प्रक्र ७२/१४४४ दि.५ मे २००० अन्वये हा सुधारत नमुना समाविष्ट करण्यात आला.

२ अधिसूचना क्र.जिनीस२०००/प्रक्र ७२/१४४४ दि.९ एप्रिल २००७ अन्वये प्रवर्ग या शब्द समाविष्ट करण्यात आला.

**नमुना तीन (अ)**

(नियम २५ (१) पहा)

**निवडणूक प्रतिनिधीची नेमणूक**

---------------------------- जिल्हा नियोजन समितीची निवडणूक

प्रति,

निर्वाचन अधिकारी,

-----------------

मी, -------------------------------------------------- राहणार ------------------------ वरील निवडणूकीसाठी असलेला उमेदवार याद्वारे, माझा निवडणूक प्रतिनिधी म्हणून ------------- - याची या तारखेपासून नेमणूक करीत आहे.

ठिकाण :

उमेदवाराची

स्वाक्षरी

दिनांक :

वरील नेमणुकीस माझी संमती आहे.

ठिकाण :

निवडणुक प्रतिनिधीची

स्वाक्षरी

दिनांक :

(मान्यता दिली)

निर्वाचन अधिका-याची स्वाक्षरी
व मोहोर

**नमुना तीन (ब)**

(नियम २५ (२) पहा)

१ [**निवडणुक प्रतिनिधीची नेमणूक रद्द करणे**]

------------------- जिल्हा नियोजन समितीची निवडणूक

प्रति,

निर्वाचन अधिकारी,

------------------

मी, ------------------------------------------------------------ वरील निवडणुकीसाठी असलेला उमेदवार याद्वारे ---------------------------------- याची निवडणूक प्रतिनिधी म्हणून नेमणूक रद्द करीत आहे.

ठिकाण : उमेदवाराची स्वाक्षरी

दिनांक :

---

१. अधिसूचना क्रमांक जिनिस-१००७/प्र.क्र.२२/का.१४४४, दि.८ ऑगस्ट, २००८ अन्वये असा

[1][नमुना वीस (क)]
(नियम २५ (अ) पहा)
[2][मतदान प्रतिनिधीची नेमणूक]

---------------------------- जिल्हा नियोजन समितीची निवडणूक

प्रति,

निर्वाचन अधिकारी,

----------------

मी, ---------------------------------------------------- उमेदवार/निवडणूक प्रतिनिधी

(उमेदवाराचे नाव व पत्ता) ---------------------------------------- यांचा निवडणूक प्रतिनिधी याद्वारे,

---------------------------- यांची मतदार केंद्र क्रमांक --------------------------------

येथे/मतदानासाठी निश्चित केलेली जागा ------------------------ येथे ----------------------

वाजता हजर राहण्याकरिता मतदान प्रतिनिधी म्हणून नेमणूक करीत आहे.

ठिकाण :

उमेदवाराची/निवडणूक प्रतिनिधीची सही.

दिनांक :

मी असा मतदान प्रतिनिधी म्हणून काम करण्याचे कबूल करतो.

ठिकाण :

मतदान प्रतिनिधची स्वाक्षरी.

दिनांक :

---

१ अधिसूचना क्र.जिनीस२०००/प्रक्र ७२/१४४४ दि.५ मे २००० अन्वये हा सुधारत नमुना समाविष्ट करण्यात आला.

२. अधिसूचना क्रमांक जिनिस-१००७/प्र.क्र.२२/का.१४४४, दि.८ ऑगस्ट, २००८ अन्वये असा

## नमुना तीन (ड)

(नियम २५ (अ) पहा)

## मतदान प्रतिनिधीची नेमणूक रद्द करणे

-------------------- जिल्हा नियोजन समितीची निवडणूक

प्रति,

मतदान केंद्राध्यक्ष,

मी, ------------------------------------------------------ वरील निवडणुकीतील उमेदवार (---------------------------- चा निवडणूक प्रतिनिधी) याद्वारे माझा/त्यांचा [1][निवडणुक प्रतिनिधी] म्हणून करण्यात आलेली ------------------------------ यांची नेमणूक रद्द करीत आहे.

ठिकाण :

नेमणूक रद्द करणा-या व्यक्तीची सही.

दिनांक :

---

१. अधिसूचना क्र.जिनीस२०००/प्रक्र ७२/१४४४ दि.९ एप्रिल २००७ अन्वये असा बदल करण्यात आला.

## नमुना चार
(नियम २७ पहा)
### (जागा अविरोध असेल अशा निवडणुकीतील वापरासाठी)

जिल्हा नियोजन समिती (निवडणूक) नियम, १९९९ च्या नियम २७ अन्वये निवडणुकीचा निकाल जाहीर करणे.

----------------------------- जिल्हा नियोजन समितीची निवडणूक नियम, १९९९ च्या तरतुदीनुसार मी असे जाहीर करितो की --

श्री.------------------------------------ पत्ता ---------------------------------------------

(श्री. ---------------------------------------------------- पत्ता ------------------------------------

यांच्याकडून पुरस्कृत) हे ------------------------------------ या मान्यताप्राप्त/नोंदणीकृत पक्षाचे

------------------------------------------ या मतदार संघातील जागा भरण्यासाठी यथोचितरित्या

निवडून आले आहेत.

ठिकाण :

दिनांक :

सही ----------------
निर्वाचन अधिकारी

१[नमुना [illegible]]

(नियम ३१(२) पहा)

[illegible]

अनुक्रमांक -------------

____________ जिल्हा नियोजन समिती

____________ मतदारसंघ

____________ प्रवर्ग

मतदाराची सही किंवा

अंगठा

--------------------------------------------------------------------------------- येथून

फाडावे.

अनुक्रमांक -------------

------------- जिल्हा नियोजन समिती

------------- मतदार संघ

------------- प्रवर्ग

मतदार संघातून निवडून द्यावयाच्या उमेदवारांची संख्या-----------------------

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव | पसंतीक्रम अंकामध्ये नमुद करणे |
|---|---|---|
| १. | | ( ) |
| २. | | ( ) |
| ३. | | ( ) |
| ४. | | ( ) |

**टीप** :- प्रत्येक मतदारसंघासाठी मतपत्रिका प्रवर्ग निहाय छापलेली असावी.

---

१ अधिसूचना क्र.जिनीस.-१००७/प्रक्र २२/का.१४४४ दि.८ ऑगस्ट, २००८ अन्वये पूर्वीच्या नमुन्याऐवजी हा नमुना समाविष्ट करण्यात आला.

## नमुना सहा

[नियम ३९ (१) पहा]

### अंध किंवा अपंग मतदाराच्या सोबत्याचे प्रतिज्ञापन

----------------------------मतदार संघ (-------------------- जिल्हयामध्ये समाविष्ट असलेला) -------------------- मतदान केंद्राचा क्रमांक आणि नाव --------------

मी श्री.--------------------------------------------------------(वडिलांचे नांव)-------------- -वय ------------------------------------------ *राहणार ------------------------------

याद्वारे घोषित करतो की,

(अ) मी आज दि. ---------------- रोजी कोणत्याही मतदान केंद्रात कोणत्याही इतर मतदाराचा सोबती म्हणून काम केलेले नाही.

(ब) मी श्री. ------------------------------ +यांच्या वतीने नोंदविलेले [१][पसंतीक्रम] गुप्त ठेवीन.

सोबत्याची स्वाक्षरी

* पूर्ण पत्ता द्यावा.

\+ मतदाराचे नाव, भाग क्रमांक व अनुक्रमांक द्यावा.

---

१. अधिसूचना क्रमांक जिनिस-१००७/प्र.क्र.२२/का.१४४४, दि.८ ऑगस्ट, २००८ अन्वये असा बदल करण्यात आला.

## नमुना सहा (अ)
## [नियम३९ (२) पहा]
## अंध व अपंग मतदारांची यादी

------------------------------------------------------------ या मतदार संघातील

------------------------------------------------------ जिल्हा नियोजन समितीची निवडणूक

मतदाराच्या केंद्राचा क्रमांक व नाव ------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------- मतदार संघ

मतदानाच्या ठिकाणाचे नाव ---------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------

| मतदाराचा [1]भाग क्रमांक व अनुक्रमांक | मतदाराचे संपूर्ण नाव | सोबत्याचे संपूर्ण नाव | सोबत्याचा पत्ता | सोबत्याची सही |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |

----------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------

ठिकाण :

दिनांक : मतदान केंद्राध्यक्षाची सही

----------------------------------------------------------------------------------

१ अधिसूचना क्र.जिनीस२०००/प्रक्र ७२/१४४४ दि.९ एप्रिल २००७ अन्वये असा बदल करण्यात आला.

१***

# नमुना आठ

(नियम ४४ (१) पहा)

## मतपत्रिकांचा हिशोब

ग्रामीण/मोठया नागरी/लहान नागरी/नगर पंचायत मतदार संघातील ---------------------जिल्हा नियोजन समितीची निवडणूक

मतदान केंद्राचे नाव व क्रमांक ---------------------------------------------------------

| | अनुक्रमांक | | एकूण संख्या |
|---|---|---|---|
| | पासून | पर्यंत | |
| १.मिळालेल्या मतपत्रिका : | | | |
| २. न वापरलेल्या मतपत्रिका : (म्हणजेच मतदारांना न दिलेल्या)<br>अ) मतदान केंद्राध्यक्षाची स्वाक्षरी असलेल्या : | | | |
| | | | |
| ब) मतदान केंद्राध्यक्षाची स्वाक्षरी नसलेल्या : | | | |
| एकूण (अ+ब) | | | |
| ३. *मतदान केंद्रावर वापरलेल्य मतपत्रिका(१ - २ =३)<br>(*अनुक्रमांक देण्याची आवश्यकता नाही) | | | |
| ४. मतदान केंद्रावर वापरलेल्या परंतु, मतपेटीत न टाकलेल्या मतपत्रिका:<br>अ) नियम ४० अन्वये मतदान कार्यपध्दतीचा भंग केल्यामुळे रद्द केलेल्या मतपत्रिका : | | | |
| | | | |
| ब) इतर कारणांमुळे रद्द केलेल्या मतपत्रिका : | | | |
| २*** | | | |
| ३ [एकूण(अ+ब)] | | | |
| ५. *मतपेटीत आढळून येणा-या मतपत्रिका (३ - ४ = ५)<br>(*अनुक्रमांक देण्याची आवश्यकता नाही) | | | |
| | | | |

ठिकाण :

दिनांक :

मतदान केंद्राध्यक्षाची सही

---

१. अधिसू. क्रमांक जिनिस-१००७/प्र.क्र.२२/का.१४४४, दि.८ ऑगस्ट, २००८ अन्वये नमुना ७ वगळण्यात आला.

२. अधिसूचना क्रमांक जिनिस-१००७/प्र.क्र.२२/का.१४४४, दि.८ ऑगस्ट, २००८ अन्वये खंड (क) वगळण्यात आला.

३. अधिसूचना क्रमांक जिनिस-१००७/प्र.क्र.२२/का.१४४४, दि.८ ऑगस्ट, २००८ अन्वये असा बदल करण्यात

## १[नमुना आठ (१)]

{नियम क्र. ४८(अ) पहा}

## मतमोजणी प्रतिनिधीची नेमणूक

________ जिल्हा नियोजन समितीची निवडणूक

प्रति,
निर्वाचन अधिकारी,

मी, ______________ वरील निवडणुकीसाठी असलेला उमेदवार / (उमेदवाराचे नांव व पत्ता) __ _________ या उमेदवाराचा निवडणूक प्रतिनिधी, याद्वारे, ________________ या मतमोजणीच्या ठिकाणी सकाळी _______ वाजता मतमोजणी प्रतिनिधी म्हणून उपस्थित राहण्यासाठी ________________ याची माझा मतमोजणी प्रतिनिधी म्हणून नेमणूक करीत आहे.

ठिकाण : उमेदवाराची/निवडणूक प्रतिनिधीची सही.

दिनांक :

मतमोजणी प्रतिनिधी म्हणून काम करण्यास माझी संमती आहे.

ठिकाण: मतमोजणी प्रतिनिधीची सही.
दिनांक :

---

१ अधिसूचना क्र.जिनीस२०००/प्रक्र ७२/१४४४ दि.९ एप्रिल २००७ अन्वये हा नमुना समाविष्ट करण्यात आला.

[१][नमुना आठ (२)]

{नियम क्र.४८ (अ) पहा}

**मतमोजणी प्रतिनिधीची नेमणूक रद्द करणे**

________ जिल्हा नियोजन समितीची निवडणूक

प्रति,
निर्वाचन अधिकारी,

मी, ______________ वरील निवडणुकीतील उमेदवार ------------------------ --- याचा निवडणूक प्रतिनिधी, याद्वारे, ______________ याची मतमोजणी प्रतिनिधी म्हणून करण्यात आलेली नेमणूक रद्द करीत आहे.

ठिकाण :

उमेदवाराची/निवडणूक प्रतिनिधीची सही.

दिनांक :

---

१ अधिसूचना क्र.जिनीस२०००/प्रक्र ७२/१४४४ दि.९ एप्रिल २००७ अन्वये हा नमुना समाविष्ट करण्यात आला.

[1][नमुना नऊ]

(नियम ५५ पहा)

**अंतिम निकालपत्र**

----------------------- जिल्हा नियोजन समिती

----------------------- निर्वाचन क्षेत्र

[2][ --------------------- प्रवर्ग]

एकूण मतदारांची संख्या:-

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव [3]*** | [4][ उमेदवार कोणत्या फेरीत निवडून आला व वगळण्यात आला त्याचा क्रमांक] |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | | |
| २ | | |
| ३ | | |
| ४ | | |

वैध मतांची संख्या : ---------------------

नाकारलेल्या मतपत्रिकांची संख्या : ----------

[5]***

देण्यात आलेली एकूण मते : ---------------

याद्वारे मी निर्वाचन अधिकारी ---------------------- जिल्हा नियोजन समिती खालील उमेदवारांना वैधरित्या निवडून आल्याचे जाहीर करीत आहे.

ठिकाण : **निर्वाचन अधिकारी**

दिनांक :

---

१ अधिसूचना क्र.जिनीस-१०९९/प्रक्र ७२/१४४४ दि.५ मे २००० अन्वये हा नमुना समाविष्ट करण्यात आला.

२. अधिसूचना क्रमांक जिनिस-२०००/प्र.क्र.७२/का.१४४४, दि.९ एप्रिल, २००७ अन्वये हे समाविष्ट करण्यात आले.

३. अधिसूचना क्रमांक जिनिस-२०००/प्र.क्र.७२/का.१४४४, दि.९ एप्रिल, २००७ अन्वये स्तंभ (३) लिंग व स्तंभ (४) हे वगळून पुढील स्तंभ (५) ला (३) हा क्रमांक देण्यात आला.

४. अधिसूचना क्रमांक जिनिस-१००७/प्र.क्र.२२/का.१४४४, दि.८ ऑगस्ट, २००८ अन्वये असा बदल करण्यात आला. .

५. अधिसूचना क्रमांक जिनिस-१००७/प्र.क्र.२२/का.१४४४, दि.८ ऑगस्ट, २००८ अन्वये "प्रदत्त